॥ श्री ॥

रत्नागिरी येथील सावंत साळुंखे घराण्याची

कैफियत व वंशावळ

लेखकः- भालचंद्र रत्नोजी सावंत साळुंखे

पुनर्मुद्रण

१९९०

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

रत्नागिरी येथील सावंत-साळुंखे घराण्याची

कैफियत व वंशावळ.

लेखक व प्रकाशक

भालचंद्र रत्नोजी सावंत साळुंखे

मु. मिऱ्या,

जिल्हा-रत्नागिरी.

आवृत्ति पहिली.

१९३२

मुद्रकः-रा. रा. रघुनाथ दिपाजी देसाई, न्यू भारत प्रिन्टींग प्रेस, मुंबई

(सदर पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीची पुन्हा नवीन छपाई लेंखक-प्रकाशकाच्या परवानगीने श्री. गंगाधर रघुनाथ सावंत, अध्यक्ष. देवस्थान कमिटी सडामिऱ्या ता. रत्नागिरो. यांनी करून घेतली आहे.)

जून १९९०

मुद्रक :— अंकुश ल. भाटकर, कल्पनिल प्रि. प्रेस, रत्नागिरी.

॥ श्री ॥

अर्पण पत्रिका

ज्यांनी मातेच्या मागे आपल्या वात्सल्यपूर्ण हृदयाचे माझ्यावर पांघरूण घालून, मला मातृ-वियोगाच्या दुःखाची झळ आपल्या अंतसमयापर्यंत लागू दिली नाही; आणि मला यथाशक्ति शिक्षण देऊन आपला पितृधर्म यथासांग पाळिला, ते माझे परमपूज्य पितृदेव कैलासवासी

रा. रा. रत्नोजी विश्रामराव सावंत

साळुंखे, पेन्शनर पोलीस सबइन्स्पेक्टर मिऱ्या यांच्या चरणी अंशतः तरी त्यांच्या ऋणातून मुक्त होण्यास्तव ही फूल नाही फुलाची पाकळी अर्पण करीत आहे.

मुंबई ११-११-३२. भालचंद्र

दोन शब्द

"बांधवहो ! आपले कुळ उत्तमातले आहे. आपण क्षत्रिय म्हणविता 'मराठा' या नामोच्चाराबरोबर आपल्यात अभिमान जागृत होतो ; आपल्या वडिलांच्या कीर्तीचा आपणास अभिमान वाटतो. आपण अमुक उच्च कुळात जन्म घेतला हे सांगण्यास आपणास उत्साह उत्पन्न होतो. मग ज्या पूर्वजांच्या नावावर सध्या आपण या अशा फुशारक्या मारितो, त्या पूर्वजांची मर्दूमकी त्यांनी ज्या कुळात जन्म घेतला त्या कुळाची थोरवी प्रकाशात आणण्यास आपण आळस करावा ही अत्यंत लाजीरवाणी गोष्ट नाही काय? ज्यास आपल्या कुळाबद्दल आदर नाही, ज्यांस ज्या लिखितावर आपल्या शूरवीर पराक्रमी पुरुषांची कीर्ती वास करीत आहे, त्या लिखितांचा कसरीने भक्षण करण्यातच आनंद वाटतो, ती प्रसिद्ध करून त्या आपल्या पूर्वजांची कीर्ती चिरस्मरणीय करण्याची बुद्धि होत नाही, त्या महाभागांनी अद्यापही सावध व्हावे व आपल्या कुळाच्या मानमान्यतेस त्या कुळात जन्म घेतलेल्या पूर्वजांच्या कीर्तीस चिरस्थाईपणा देण्याचे कर्तव्य बजावून प्रत्येक मराठ्याने आपल्यावरील ही जबाबदारी लक्षात घ्यावी, "

वरील उतारा अंकलीकर शितोळे घराण्यांच्या कैफियतीत वाचून माझ्याही मनांत आपल्या कुळाचा इतिहास बाहेर यावा अशी सहाजिक इच्छा उत्पन्न झाली; परंतु ती साध्य होण्याला मुख्य साधन म्हणजे पैसा आणि विद्वत्ता हेच होय. पण दुर्दैवाने त्या दोन्ही साधनांनी माझ्यावर अवकृपा केली असल्यामुळे हे कार्य कोणत्या मार्गाने पार पाडावे याचा उलगडा मला होईना. पदरी विश्वविद्यालयाची एकादी पदवी असती तरी तिच्या जोरावर एकाद्या लक्ष्मीपुत्रास भर घालून त्यास या कार्यास मदत करावयास पुढे आणिले असते, किंवा लक्ष्मी असती तरी मारून मुटकून एकाद्या पदवीधरास मुसलमान बनविला असता; परंतु दोन्ही गोष्टींचा ज्या ठिकाणी अभाव तेथे सर्वच बाजार बंद पडला आणि मनातील मांडे मनांतच राहिले. माझ्या वडिलांनी घरी असलेल्या जुन्या कागदपत्रांच्या आधारे एक मिऱ्या येथील सावंत, साळुंखे घराण्याची वंशावळ तयार केली होती, ती व इतर काही जुने कागदपत्र मी घरातील दप्तर चाळीत असता मला आढळले. तेव्हा पूर्वीची इच्छा पुन्हा प्रबल होऊन कांही झाले तरी हे कार्य शेवटास नेण्याचा मी निश्चय केला व मी तो आपला मनोदय माझ्या कांही बांधवांना विदीत केला. परंतु थोडक्याच लोकांना तो पटला, आणि त्यांनी मला या कामी शक्य ती मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यात प्रामुख्याने भाग घेणारे रा. रा. गोविंद राम सावंत झाडगाव, रा. रा. गोपाळ भाऊराव सावंत शिवरे. रा. रा. बाळकृष्ण रामचंद्र सावंत व रा. रा. बाळकृष्ण भवानराव सावंत मिऱ्या हे होत. त्यांनी मला या कार्यात शक्य ती मदत केल्याबद्दल मी त्यांचे फार आभार मानतो. भारताचार्य रा. रा. चिंतामणराव वैद्य, एम्. एल्. एल्. बी. यांनी आपला अमुल्य वेळ खर्च करुन व प्रस्तुत ग्रंथ लक्षपूर्वक वाचून त्याच्यावर आपले मत दिले

त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. तसेच ज्यानी ज्यानी आपल्यापाशी असलेले जुने कागद दाखविले त्यांचेही मी मनःपूर्वक आभार मानतो.

प्रस्तुत ग्रंथ हा विद्वत्ताप्रचूर नसून त्यांत मी आपल्या पूर्वजांचे स्मृतिचित्र माझ्या सामर्थ्यानुरूप रेखाटले आहे, त्यात अनेक दृष्टीने उणीव राहिली असेल, परंतु सहृदय वाचक त्याचा हंसक्षीर न्यायाने आस्वाद घेतील अशी आशा आहे. इतिहासासारखा ठराविक साधनांनी मर्यादित असलेला विषय विस्तृत स्वरूपात प्रतिपादन करणे विद्वत्तेचे काम आहे, व प्रस्तुत कुळात तशी माणसे कमी आहेत. शिवाय त्यानाही आपल्या व्यवसायामुळे हे इतके महत्वाचे काम आहे असे वाटत नसेल. आणि एका दृष्टीने त्यांचे म्हणणे खरेही असू शकेल. "उगाच आपल्या पूर्वजांच्या फुशारक्या मारण्यात काय अर्थ?" असल्या प्रकारचे उद्गार मी हे काम सुरू केल्यावर कांही गृहस्थांच्या मुखातून निघाले आहेत; परंतु त्याना माझे नम्रपणे असे उत्तर आहे की, कै. रा. रा. राजवाडे व पारसनिस यांच्यासारख्या इतिहास-प्रिय लोकांनी अविश्रांत श्रम घेऊन मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश पाडीला नसता तर हिंदवी स्वराज्याची संस्थापना करणाऱ्या शिवछत्रपतीला एका लुटारू टोळीचा नायक समजण्यात आले असते. तेव्हां प्रत्येक व्यक्तीने आपली जबाबदारी ओळखून बोलले पाहिजे. अस्तु. माझ्या सामर्थ्यानुरूप माहिती मिळवून ही माझी कुळकथा आपल्या ओबडधोबड भाषेत वाचक वृंदापुढे ठेवीत आहें. तिला ते गोड करून घेतील व त्यातील मुद्रण दोषाकडे सहृदयतेने पाहतील अशी प्रार्थना करून मी आपल्या वाचकांचा निरोप घेतो.

मुंबई ११-११-३२ भालचंद्र

॥ श्री ॥

अभिप्राय

रत्नागिरी जवळील झाडगांव वगैरे ठिकाणच्या सावंत साळुंखे घराण्याचा हा इतिहास मनोरंजक व महत्वाच्या माहितीने भरलेला आहे. हे इ. स. ५०० च्या सुमारे अयोध्येहून आलेल्या पुलकेशी इत्यादि चालुक्य घराण्याचे असून चारशे वर्षांपूर्वी विजापूराकडून रत्नागिरीस बंदोबस्तासाठी आले व तेथे बसले. त्यांचे नांव सावंत (अर्थात् सामंत=सरदार) असे प्रसिद्ध होऊन हल्ली हे घराणे मोठे व अनेक विद्वान लोकांचे आहे. क्षत्रियाला शस्त्र व शास्त्र दोन्ही विद्या असाव्या त्याप्रमाणे यास आहेत. परिशिष्टांत दिलेले कागद ऐतिहासिक महत्वाचे असून त्या काळच्या सर्व परिस्थितीवर प्रकाश पाडतात.

मुंबई, ९-११-३२ } **भारताचार्य* चिं. वि. वैद्य**, एम्. ए. एलएल. बी.

* टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु तसेच संस्कृत वाङ्मयाचा इतिहास मध्ययुगिन भारत, महाभारत उपसंहार, शिवछत्रपतीचे चरित्र, हिंदु धर्माची तत्वे इत्यादि ग्रंथांचे कर्ते.

रत्नागिरी येथील सावंत साळुंखे घराण्याची

कैफियत व वंशावळ

-०-०-०-

चालुक्य ऊर्फ साळुंखे कुळाची पौराणिक उत्पत्ती.

-०-०-०-

कोणे* एके समयी ब्रह्मदेव प्रातःकाळचे संध्यादि कर्मानुष्ठान करीत असता, त्याच्याकडे इंद्र आला, आणि पृथ्वीवर पाप फार झाले, तीतील एकही माणूस यज्ञयागादि कर्मे करीत नाही, किंवा देवास हविबलि इत्यादी द्यावयाचे ते देत नाही. असे त्याजपाशी त्याने गाऱ्हाणे केले ते ऐकून अर्घ्य प्रदानाकरिता पाणी धरण्यासाठी चुलक म्हणजे दोन्ही हाताचे पंजे एकमेकाशी जोडून अंजलि (ओंजळ) केलेला होता. त्याकडे ब्रह्मदेवाने दृष्टी लाविली, तेव्हा त्या चुलुकापासून तात्काळ एक अति-बलाढ्य वीर निर्माण होऊन उडी मारून बाहेर निघून आला, तो चालुक्य वंशाचा आद्य जनक झाला. तदनंतर काही काळाने त्या कुळात 'हारित' व 'मानव्य' या नावाचे दोन महापराक्रमी पुरुष जन्मास आले आणि त्यानी ते कुळ मोठ्या नावारूपास चढविले. त्या वंशाचे मूलस्थान अयोध्या हे होते. पुढे कालगतीने त्या वंशाची एक शाखा दक्षिणेत येऊन स्थायिक होऊन राहिली.

वरील चालुक्य वंशाची पौराणिक हकिगत या विसाव्या शतकात भौतिक ज्ञानाच्या अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या झालेल्या विद्वानांच्या बुद्धिमत्तेला पटणार नाही याचे कारण आमचे पुराण म्हणजे आश्चर्य-कारक व चमत्कारिक भाकडकथाच, असा त्यांचा सर्वसाधारण समज असतो परतु स्वामी रामतीर्थ ह्यानी आपल्या ग्रंथात एका ठिकाणी असे म्हटले आहे की "आमची पुराणे अत्यंत ज्ञानी जनतेच्या उपयोगी आहेत." या स्वामींच्या म्हणण्याचा अर्थ इतकाच की, पौराणिक कथा म्हणजे काव्यात्मक इतिहास आहे; आणि काव्यातील मूळ विषय सत्य,

* बीजेक्रत क्षत्रिय आणि त्यांचे अस्तीत्व या पुस्तका आधारे.

असून त्याचा परिपोष करिताना, व त्याला चटकदार बनविताना, कल्पनातीत असंख्य साधनाचा उपयोग केलेला असतो. तेव्हा त्यातील सत्यभाग शोधून काढणे अत्यंत कठीण आहे. व ते ज्ञानी माणसावाचून सर्वसाधारण जनतेला समजणे तर फारच कठीण आहे, असे स्वामींचे म्हणणे आहे. उदाहरणार्थ आपण इसापनीतीतील एका कुत्र्या-मांजराची गोष्ट घेऊ. तिचा जर आपण वाच्यार्थ घेतला तर पूर्वी कुत्रा व मांजर मनुष्याप्रमाणे बोलत होती असा निघेल, परंतु मूळ हेतु सिद्ध करण्या-करिता वरील एक उपकथा आहे, एवढे लक्षात ठेविले म्हणजे गैरसमज होणार नाही. अशारीतीने ज्ञानी मनुष्यानी पुराणाचे निरीक्षण केल्यास तेच पुराण प्राचीन आर्यावर्तातील एक आदर्शभूत इतिहास झाल्यावाचून रहाणार नाही. वरील चालुक्य कुळाच्या उत्पत्तीतही चुलुकापासून चालुक्य वीर उत्पन्न झाला हे आहे. पण आपण सूक्ष्म विचार केल्यास ब्रह्मदेवाने चुलुक केल्यास स्थितीत एका वीराची पृथ्वीवरील पापे नाश करण्यास नेमणूक केली त्याच वीराला चालुक्य हे नाव मिळाले. असा त्याचा अर्थ लाविल्यास वावगें होणार नाही.

पूर्वकालीन चालुक्य

महाराष्ट्रात चालुक्य सत्तेचा उदय होण्यापूर्वी पल्लव ऊर्फ पालव वंशाच्या राजाचा अंमल होता. "त्रिलोचन पालव ह्याच्या कारकीर्दीत चालुक्य वंशीय " जयसिंह " ऊर्फ विजयादित्य " याने मोठ्या सैन्या-सहवर्तमान प्रथम अयोध्येमधून येऊन पालव वंशीय राजावर स्वारी केली. कोठे कोठे राष्ट्रकूट राजांबरोबरही विजयादित्याने लढाया केलेल्या आढळून येतात ; तेव्हां सहाव्या शतकापासून या महाप्रतापी चालुक्य वंशाची राज्यसत्ता दक्षिणेत चमकू लागली; ही गोष्ट इतिहास प्रसिद्ध आहे. अशातऱ्हेने दक्षिणेत चालुक्य सत्ता विराजमान झाली व जय-सिंहानंतर त्याचा मुलगा रणराग गादीवर बसला हा आपल्या बापा-प्रमाणेच शूर होता. त्याने आपले राज्य बरेच वाढविले ; रणरागाने आपणाला विष्णूवर्धन हा किताब धारण केला होता व त्याने आपल्या राज्याचा पाया मजबूत करण्याकरिता पालव वंशीय राजकन्येबरोबर विवाह करुन शत्रुपक्षालाही आपल्या बाजूकडे वळवून घेतले होते. या वरून तो शौर्याप्रमाणे मुत्सद्दीहा होता तो रणरागापेक्षांही प्रतापी निप-जला. त्याने आपले राज्य अधिक विस्तृत करून आपली राजधानी " वातापिपूर " ज्याला सांप्रत बदामी म्हणतात तेथे केली हे बदामी

शहर विजापूर जिल्ह्यात आहे. ह्या राजाने मोठा यज्ञ करून अनेक प्रकारची महादाने दिली होती. तो आपणाला सत्याश्रय पुलकेशी वल्लभ महाराज म्हणवित असे. पुलकेशी नंतर त्याचा पुत्र कीर्तीवर्मा सिंहा-सनारूढ झाला. त्याने इ. स. ५६७ ते ५९१ पर्यंत राज्य केले. आज पर्यंत या घराण्याचे ताम्रपट व शिलालेख उपलब्ध झाले आहेत, त्या वरून पाहता ह्याच राजापासून चालुक्य वंशीय राजाच्या कारकीर्दीच्या इसवी सनांचा व्यवस्थित बोध होतो. कीर्तीवर्म्याने कोंकण प्रांतातील मौर्य ऊर्फ मोरे, नल आणि *बनवासी येथील कदंब ह्यांचा पराभव करून आपल्या राज्याचा विस्तार केला. ह्याच्या निधनसमयीं त्याला तीन अल्पवयी पुत्र होते म्हणून त्याचा भाऊ मंगलीश गादीवर बसला. त्याने इ. स. ५९१ ते ६१० पर्यंत राज्य केले. त्यावेळी कलचुरी वंशाचे राजे + चेदी नामक देशावर राज्य करीत होते त्यांची राजधानी त्रिपूर म्हणजे जबलपूराजवळ असलेले तेवूर गांवी होती. मंगलीशाने त्या राजा-ला जिंकून त्याचा मुलूख काबीज केला. तसेच पश्चिम समुद्राकडील प्रांतावर स्वारी करून बराच प्रदेश आपल्या राज्याला जोडीला. मंगली-शाला त्याच्या पुतण्याच्या अल्पवयामुळे गादी मिळाली होती. परंतु त्याचा पुतण्या वयांत येताच, त्याच्या मनांत दुजाभाव उत्पन्न झाला आणि त्याने आपल्या पुतण्याचा गादीवरील वारसा काढून टाकण्याचे कारस्थान आरंभिले. परंतु त्याचा सर्वात वडील पुतण्या कर्तृत्ववान निपजल्यामुळे मंगलीशाचे कांही एक चालले नाही व पुढे थोड्याच काळात तो मृत्यू पावला.

मंगलीशाच्या पाठीमागे त्याचा पुतण्या पुलकेशी हा गादीवर बसला. हा महापराक्रमी असल्यामुळे, त्याने चालुक्यांचे वैभव परमा-वधीला नेले. ह्याची कारकीर्द इ. स. ६११ ते ६४० पर्यंत झाली.

बनवासीच्या कदंब राजाचा पुरा मोड करून, बनवासी आपल्या राज्याला जोडीला. पश्चिम समुद्रावर पुरी (मुंबई जवळचे घारापुरी) नांवाचे एक शहर होते, त्याच्यावर अनेक गलबताचे एक आरमार करून छापा घातला व ते काबीज केले. मालवा, गुजराथ व टाट वगैरे प्रांतावर स्वाऱ्या करून ते सर्व प्रांत आपल्या अंमलाखाली आणिले, पुलकेशीने अनेक राजांस जिंकून त्याना आपल्या साम्राज्य सत्तेखाली आणिले. उत्तरेकडे प्रसिद्ध असलेला तत्कालीन पराक्रमी, राजा हर्षवर्धन

* सध्याचा गोवेप्रांत + हा प्रांत पूर्वी जबलपूराजवळ होता.

हा कनोज येथे राज्य करीत होता; परंतु दैव बलाने तो उत्तरेकडील सर्व प्रदेशाचा सार्वभौम राजा झाला. त्याने आपली सत्ता दक्षिणेकडे वाढवावी म्हणून बराच प्रयत्न केला व स्वाऱ्याही केल्या. त्यावेळी महा-प्रतापी पुलकेशीने त्याचा पराभव करून त्याला नर्मदेच्या पार केले. या विजयाने पुलकेशीची कीर्ती चोहीकडे पसरली. उत्तरेकडील एका बलाढ्य राजाचा आपण पराभव केला या विजयानंदाने पुलकेशी हर्ष पावून त्याने आपल्या नावापुढे 'परमेश्वर' ही पदवी जोडली ; ही पदवी त्या वंशांतील पुढील सर्व राजेही लावीत आपल्या राज्याच्या संरक्षणार्थ त्याने नर्मदेच्या काठी मोठी फौज ठेविली होती. कलींग कोसल पांडच व केरल ह्या देशांचे सर्व राजे पुलकेशीला शरण आले आणि त्याच्यापाशी स्नेहभावाने वागू लागले. सारांश त्यावेळी दक्षिणेतील सर्व राज्यांवर चालुक्यांचा साम्राज्य ध्वज फडकत होता. कृष्णा व गोदावरी यामधील प्रांताला त्यावेळी वेंगी हे नाव होते तो प्रांत जिंकून पुलकेशीने आपला भाऊ विष्णूवर्धन ह्याच्या ताब्यात दिला होता; वेंगीचा चालुक्य वंश ह्याच विष्णूवर्धनाचा आहे असे इतिहासावरून स्पष्ट दिसते.

या वेंगीच्या चालुक्य वंशानेही बराच काळ राज्याचा उपभोग घेतला. पुढे चोल वंशांतील एक नातेवाईक, या गादीवर येऊन वेंगीच्या चालुक्य वंशाचे राज्य चोल घराण्यांत अंतर्गत झाले त्याचप्रमाणे पुलकेशीने आपला तिसरा भाऊ जेसिंह यांस गोपराष्ट्र (नाशिक प्रांतावर राज्य करावयास पाठविले होते हे जयसिंहाचा पुत्र नागवर्धन ह्याने देव-ळांच्या पुजेकरिता गावदान दिल्याचे ताम्रपटावरून आढळून येते ह्याच पुलकेशीचा वडील मुलगा चंद्रादित्य हा सावंतवाडीकडील प्रांतावर राज्य चालवित होता. यावरून आपल्या विस्तारयुक्त साम्राज्य ची व्यवस्था योग्य तऱ्हेने चालावी म्हणून पुलकेशी आपल्याच वंशजाकडे आपल्या राज्यांतील भाग सोपवित असे हे स्पष्ट दिसून येते, व त्यामुळेच चालुक्य ऊर्फ साळुंखे कुळाचे अवशिष्ट भाग निरनिराळ्या ठिकाणी आढळून येतात.

वरील विवेचनावरून पुलकेशी हा अत्यंत पराक्रमी व मुत्सद्दी राजा होऊन गेला यात तिळमात्र शंका नाही. त्याची कीर्ती हिंदुस्थानांत नव्हे तर बाहेर देशीही पसरली होती हे तत्कालीन हिंदुस्थानांत प्रवास करीत असलेल्या ह्यूएनत्संग या नावाच्या चिनी प्रवाशाच्या उद्गारा-वरून कळून येईल. ह्या ह्यूएनत्संग चिनी प्रवाशाने चालुक्याच्या

साम्राज्याविषयी व स्वतः पुलकेशीविषयी किती अवर्णनीय उद्गार काढिले आहेत, ते भारतीय इतिहासात नमूद आहेतच. विस्तारभयास्तव ते येथे देण्याचे टाळतो.

पुलकेशीनंतर त्याचा पुत्र विक्रमादित्य गादीवर बसला. त्याने इ. स. ६४१ पासून ६८० पर्यंत राज्य केले. विक्रमादित्य बापाप्रमाणेच शहाणा, धैर्यवान् व शूर होता. त्याने आपल्या कारकीर्दीत दक्षिणेकडील पल्लव, चोल, केरळ इत्यादी राजांची बंडें मोडली व आपल्या राज्याचा वि-स्तार केला. विक्रमादित्याच्या मागे त्याचा पुत्र विनयादित्य सिंहासनारूढ झाला. त्याने ६८० पासून ६९६ पर्यंत राज्य केले. ह्याने पल्लवादि राजांना पादाक्रांत करण्यास आपल्या बापाला सहाय्य केले होते. विनयादित्या-मागून त्याचा पुत्र विजयादित्य गादीवर बसला. त्याने इ. स. ६९६ पासून ७३३ पर्यंत राज्य केले. ह्याच्या कारकीर्दीत राज्यव्यवस्था उत्तम-प्रकारे होती. ह्या राजाची देवाधर्मावर फारच श्रद्धा असलेली दिसून येते गादीवर बसताच ह्याने वातापिपूर येथे ब्रह्मा, विष्णु आणि महेश ह्या तीन देवस्थानांची स्थापना केली. विजयादित्यानंतर त्याचा पुत्र दुसरा विक्रमादित्य ह्याने ७३३ पासून ७४७ पर्यंत राज्य केले. त्यानेही उत्तम तऱ्हेने राज्यशकट हाकला. त्याचा शत्रु पल्लव वंशीय राजा नंदी पोतवर्म ह्याने चढाई केली होती; परंतु विक्रमादित्याने त्याचा पूर्ण पराभव केला त्या लढाईत विक्रमादित्यास पुष्कळ संपत्ती मिळाली. ती त्याने लढाईत मिळालेल्या विजयाच्या स्मारकाप्रित्यर्थ खर्च केली. तदनंतर त्याचा पुत्र दुसरा कीर्तिवर्मा हा गादीवर बसला त्याने ७४७ पासून ७५३ पर्यंत राज्य केले. ह्या राज्याच्या कारकीर्दीत पूर्वकालीन चालुक्यांचा ऱ्हास झाला व महाराष्ट्राचे अधिपत्य चालुक्यांच्या हातून राष्ट्रकूट वंशाकडे गेले. राष्ट्रकूट वंशांतील दंतीदुर्ग या नावाच्या राजाने अफाट फौजेनिशी चालुक्यांवर स्वारी करून कीर्तिवर्म्याचा पूर्ण पराभव केला. व महा-राष्ट्रावर आपली सत्ता प्रस्थापित केली. अशातऱ्हेने पूर्वकालीन चालुक्यांची सत्ता नष्ट झाली, तरी त्यांचे अवशेष वंशज कोठे कोठे थोडीबहुत सत्ता सांभाळून होते.

उत्तरकालीन चालुक्य

मागे विदित केल्याप्रमाणे राष्ट्रकुट वंशाने चालुक्यांची सत्ता हिरावून घेतल्यावर अवशेष राहिलेल्या चालुक्य घराण्यांतील तैलप या नावाच्या पुरुषाने सुमारे २०० शे वर्षानंतर राष्ट्रकुटांचा राजा कर्क

याचा पूर्ण पराभव करून, पुनः चालुक्यांचे राज्य महाराष्ट्रावर स्थापिले चालुक्यांचे गत वैभव पुनः प्राप्त करून घेणाऱ्या या तैलपाने इ. स. ९७३ पासून ९९७ पर्यंत राज्य केले. त्याने चोलांच्या देशावर स्वारी करून तो देश आपल्या अंमलाखाली आणिला त्याचप्रमाणे चेदीचे राज्य जिंकून आपल्या राज्याला जोडिले. त्याने अनहीलपट्टण येथील चालुक्य वंशाची स्थापना करणाऱ्या मूळराजावर स्वारी केली; पण त्यात त्याला यश मिळाले नाही. माळव्यांतील मूंज राजाचा पराभव करून तो प्रांत आपल्या राज्यात सामील केला. एकंदरीत हा राजा मोठा पराक्रमी होऊन गेला. पूर्वकालीन चालुक्यांची नामशेष झालेली सत्ता ह्याने पुनः मिळविल्यामुळे, ह्याच्या कारकीर्दीपासून या चालुक्य वंशाला उत्तर-कालीन चालुक्य असे म्हणतात ह्या तैलपाला दोन पुत्र होते, सत्याश्रय आणि दशवर्ण.

तैलपाच्या मागे त्याचा वडील पुत्र सत्याश्रय हा गादीवर बसला. त्याने ९९७ पासून १००८ पर्यंत राज्य चालविले. ह्याच्या कारकीर्दीत म्हणण्यासारखे असे विशेष कांहीच घडून आले नाही. यांस पुत्रसंतती नव्हती म्हणून त्याचा कनिष्ठ बंधू दशवण याचा पुत्र पहिला विक्रमादित्य गादीचा वारस झाला. त्याने इ. स. १००८ पासून १०१८ पर्यंत राज्य केले. ह्याने राज्याचा उपभोग फारच थोडा काळ घेतला. तदनंतर त्याचा भाऊ जयसिंह ऊर्फ जगदेकमल्ल हा गादीवर बसला. त्याने माळव्यातील आपल्याविरुद्ध झालेला कट मोडून भोजराजालाही पादाक्रांत केले, व द्रमील देशच्या चोल राजाचा पराभव करून आपल्या राज्याचा विस्तार वाढविला. जगदेकमल्ल ह्याची कारकीर्द इ. स १०४० त संपली. त्याने उत्तरेकडील प्रांत जिंकण्याचा प्रयत्न केलेला आढळून यतो जगदेकमल्लामागून त्याचा पुत्र अहवमल्ल ऊर्फ पहिला सोमेश्वर गादीवर बसला. त्याने त्रैलोकमल्ल ही पदवी धारण केली होती. ह्या राजाने इ. स १०४० पासून १०६९ पर्यंत राज्य केले. ह्याने समुद्रकांठच्या प्रदेशावर स्वारी करुन कनोज व कांची येथील राजांस जिंकिले आणि गोव्यापर्यंतची संपूर्ण कोंकणपट्टी आपल्या ताब्यात घेऊन त्याचे स्मारक म्हणून एक विशाल विजयस्तंभ बांधिला. याच महाप्रतापी राजाने निजामशाहीतील बंदर शहरापासून सुमारे चाळीस मैलांवर कल्याण नामक एक सुंदर शहर वसवून, तेथे आपली राजधानी केली, त्या वेळेपासून कल्याण हेच चालुक्य वंशीय राजांचे राजधानीचे शहर झाले. या अहवमल्ल राजाला सोमेश्वर, विक्रमादित्य आणि जय-

सिंह असे तीन पुत्र होते. पैकी दुसरा विक्रमादित्य हा धूर्त व शूर असल्यामुळे त्यास युवराज पदवी देण्याचे अहवमल्लाच्या मनात होते, परंतु विक्रमादित्याने ते नाकारिल्यामुळे ज्येष्ठ पुत्र दुसरा सोमेश्वर यांसच राज्य मिळाले; तरी राज्याची व्यवस्था विक्रमादित्यच पहात असे. विक्रमादित्याने चोलवंशीय राजावर स्वारी करून त्याचे राज्य आपल्या राज्याला जोडिले. माळव्याच्या राजाला साहाय्य करून त्याने त्याच्या शत्रूचा मोड केला. बिल्हणकवीच्या काव्यावरून केरळावर स्वारी करून तेथील राजालाही त्याने जिंकिले असे दिसते. अशारितीने विक्रमादित्य विजयानंदात निमग्न असता, इकडे त्याचा बाप अहवमल्ल हा आजारी पडला; त्याला आपला अंतसमय जवळ आला असे वाटून त्याने तुंगभद्रेचे स्नान करून पुष्कळ दान धर्म केला व यज्ञयागही केले आणि मंत्रांच्या व वाद्यांच्या गंभीर नादात, तुंगभद्रा नदीत जल समाधी घेतली. हा राजा महापराक्रमी असून विद्वान् लोकांचा मोठा आदर करी.

अहवमल्ल ऊर्फ पहिल्या सोमेश्वरानंतर त्याचा ज्येष्ठ पुत्र सोमेश्वर गादीवर बसला त्याने १०६९ पासून १०७६ पर्यंत राज्य केले. त्याने आपल्या नावापुढे भुवनेकमल्ल असा किताब धारण केला होता हा अत्यंत जुलमी व कमक्कल राजा होऊन गेला; त्यामुळे त्याची प्रजा नेहमी असंतुष्ट असे; पुढे याच कारणामुळे त्याचा भाऊ विक्रमादित्य याजपाशी त्याचे वैमनस्य आले. परंतु विक्रमादित्य हा सुविचारी असल्यामुळे त्याने आपला कनिष्ठ बंधू जयसिंह यास बरोबर घेऊन कल्याण नगरी सोडिली, हे पाहून सोमेश्वराने त्याचा पाठलाग केला. परंतु विक्रमादित्याने त्याचा पराभव करून पुढचा मार्ग आक्रमण केला. त्याने गोवे, जयकेशी इत्यादि राजांना आपल्यापुढे शिरे नमविण्यास भाग पाडिले, तसेच केरळ येथील राजावर स्वारी करून त्यास त्याने शरण आणिले. वेंगीचा राजा राजिग याने चोलच्या राजावर चाल केली. तेव्हा विक्रमादित्याने त्या चोलवंशीय राजाची कन्या पूर्वी वरलेली असल्यामुळे त्याला मदत करण्याचे कबूल केले. इकडे वेंगीच्या राजाने कल्याणच्या गादीवर असलेल्या दुसऱ्या सोमेश्वरास भावाची (विक्रमादित्य) खोड मोडण्यास सल्ला दिला, व त्यानेही तो मूर्खपणाने मान्य करून विक्रमादित्यावर चाल केली. तेव्हा विक्रमादित्याने चार हिताच्या गोष्टी सांगून त्याला या कृत्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न

केला, परंतु तो व्यर्थ गेला. तेव्हा नाइलाजाने त्याने बंधूशी सामना देऊन त्याचा पूर्ण पराभव केला आणि त्याला पदच्यूत करून आपण कल्याणच्या मुख्य गादीवर बसला आणि सर्वात लहान भाऊ जयसिंह यास बनवासी येथे प्रतिनिधी नेमिले. हा मोठा पराक्रमी राजा होऊन गेला. हे मागील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत येईलच. ह्याने इ. स. १०७६ पासून ११२६ पर्यंत राज्य केल्यावर त्याचा पुत्र तिसरा सोमेश्वर हा गादीवर बसला. त्याने भूलोकमल्ल ही पदवी धारण केली. व आंध्र, द्रविड, मगध, इत्यादि देशच्या राजाना आपले मांडलीक केले. त्याने इ. स. ११२६ पासून ११३८ पर्यंत राज्य केले. हा चालुक्य वंशांत मोठा विद्वान् राजा होऊन गेला, हे त्याने रचिलेल्या "मानसोल्लास" अथवा अभिलाषितार्थ चिंतामणी या ग्रंथावरून स्पष्ट दिसून येते. हा ग्रंथ फार मोठा असून त्याचे पाच भाग केले आहेत व त्यात अनेक विषयावर सुंदर चर्चा केली आहे. त्याचे वर्णन स्थलाभावामुळे येथेः करिता येत नाही. ह्याच्या बापाने अनेक युद्धे करून आपल्या राज्याचा बराच विस्तार केला होता आणि ते सुरक्षित केल्यामुळे सोमेश्वराचा बराच काळ आनंदात व ज्ञानार्जनात गेला. आणि म्हणूनच वरील सुंदर ग्रंथ त्याच्या हातून लिहिला गेला. तिसऱ्या सोमेश्वरानंतर त्याचा पुत्र जगदेकमल्ल ह्याचे हातीं राजसूत्रे आली. त्याने ११३८ पासून ११५० पर्यंत राज्यशकट हांकिला. ह्याच्या वेळी विशेष कांही घडून आलेले नाही. जगदेकमल्लानंतर त्याचा भाऊ तैलप ऊर्फ नुर्मडीतैल हा गादीवर बसला. ह्याने ११५० पासून ११६५ पर्यंत राज्य केले वरील दोन्ही राजांच्या वेळी चालुक्यांची सत्ता बलहीन होऊ लागली होती. त्यांच्या अंमलाखालील अनेक संस्थानिकानी शिरजोर होऊन बंडे केली. त्यांच्या पैकी विज्जल नावाच्या एका कलचुरी वंशांतील संस्थानिकाने दुसऱ्या-संस्थानिकाची मदत घेऊन तैलपाला कल्याणनगरीतून पळावयास लाविले. अशारितीने कल्याण सुमारे १७ वर्षे कलचुरी वंशाच्या ताब्यात होते. परंतु तैलपाचा पुत्र चौथा सोमेश्वर ह्याने आपल्या बोम्ब नावाच्या एका पराक्रमी मांडलीकाच्या साह्याने कलचुरी वंशावर स्वारी करून चालुक्यांचे गत वैभव पुनः संपादून कल्याणची गादी हस्तगत केली. ह्या सोमेश्वराने इ. स. ११८२ पासून ११८९ पर्यंत राज्य केले. ह्याच्याच कारकीर्दीत चालुक्यांच्या साम्राज्यसत्तेचा ऱ्हास झाला. या पराक्रमी राजाने पराकाष्टा केली, परंतु अगोदरच बलहीन झालेले राष्ट्र टिकाव धरू शकले नाही. इ. स. ११८९ मध्ये सर्व सत्ता यादवांच्या

हाती गेली. दक्षिणेत यादवांचा बलाढ्य वीर वल्लाल व उत्तरेकडील भिल्लम ह्या दोन्ही पुरुषांनी अफाट फौजेनिशी चालुक्यावर चाल केली. आणि शेवटचा राजा चौथा सोमेश्वर ह्याचा पूर्ण पराभव करून त्याला पळायला लाविले अशारितीने महाराष्ट्रातील साम्राज्यसत्ता जरी यादवांच्या हाती गेली तरी या वंशांतील अनेक शाखा लहान लहान राज्ये सांभाळून ठिकठिकाणी नांदत होत्या. त्यापैकी रत्नागिरी जिल्ह्यात राजापूर तालुक्यांतील तेरवण गावी उपलब्ध झालेल्या शिलालेखावरून असे आढळून येते की, केशव महाजनी हा कामदेव नावाच्या महामंडलेश्वराचा दिवाण होता. त्याने तेरवाटक नांवाचे गोप्रदान दिले आहे. व त्या कामदेवास चालुक्य-कुल-कमल-कलिका विकासन् करणारा सूर्य असे म्हटले असून कल्याणपूराधीश्वर म्हणजे कल्याण येथे एकेकाळी राज्य करीत असलेल्या प्रतापी राजकुळातला असे म्हटले आहे. त्याचप्रमाणे कोल्हापूर येथील अंबाबाईच्या देवालयात एक शिलालेख आहे, त्यांत एका सोमदेव नावाच्या राजाने एक गाव दान दिल्याचे म्हटले आहे. हा सोमदेव चालुक्य कुळातील असून संगमेश्वर येथे राज्य करीत होता, असाही मजकूर आहे. यावरून रत्नागिरी जिल्ह्यात जी चालुक्य कुळातील विविध उपनावाची दुसरी कांही कुटुंबे निरनिराळ्या गावी नांदत आहेत. ती वरील कामदेव व सोमदेव राजांच्या वंशजांपैकीच असली पाहिजेत.

साळुंखे ऊर्फ अणेराव

संगमेश्वरपासून सुमारे १४ मैलांवर आंगवली गावी साळुंखे ऊर्फ अणेराव ह्यांचे वास्तव्य आहे. त्यांचा मूळ पुरुष कुंडी घाटानजिक महिपत गडावर सरदार होता. त्यावेळी आंगवली गावासह बारा गाव त्यांच्या ताब्यात होते, परंतु त्यापैकी आता आंगवली व सोनारवाडी असे दोनच गाव त्यांच्या मालकीचे राहिले आहेत. त्याना अरिराव सरनाईक असा किताब होता. त्या अरिरावाचाच अणेराव हा अपभ्रंश झाला असावा. देवरुख तालुक्यातील मार्लेश्वर हे प्रसिद्ध देवस्थान ह्या अणेराव साळुंख्याच्या मालकीचे आहे.

साळुंखे ऊर्फ विचारे

रत्नागिरी जिल्ह्यांतील वरावडे, पालशेत, देवीहसोळ, वरवेली व अडूर या पाच गावी विचारे उपनावाचे साळुंखे नांदत आहेत. त्याना विचारे हे नाव कसे प्राप्त झाले, ह्याचा शोध बरोबर लागू शकत नाही.

ह्या कुळात नावारूपास चढलेली काही माणसे होऊन गेली आहेत व आजही आहेत. कै. श्री. दाजी अमृतराव विचारे हे कोल्हापूर संस्थानात एक्झीक्यूटीव्ह इंजीनियर होते. त्यानी पेन्शन घेतल्यावर मराठाजातीचे पुढारी म्हणून बरेच दिवस काम केले आहे. ते लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद होते व रत्नागिरी डी. लो. चे अध्यक्षही होते. तसेच देवीहसोळ येथील रा. रा. बाळकृष्ण गोपाळ विचारे हे अगदी गरीब स्थितीतून स्वसामर्थ्याने शिक्षण संपादून बी. ए. झाले आहेत व ते सध्या मुंबई सेक्रेटरी ऑफीसमध्ये रेव्हीन्यू खात्यात असिस्टंट सुपरीटेन्डेन्ट आहेत.

साळुंखे ऊर्फ महाडिक

रत्नागिरी जिल्ह्यात कोठे कोठे महाडिक या उपनावाचे साळुंखे घराण्याचे लोक नांदत आहेत. हे घराणे इतिहासप्रसिद्ध आहे. ह्यांना महाडिक हे नाव पडण्याचे कारण ह्यांचा एक पुरुष मुसलमानी अमदानीत महाड येथे बंदोबस्ताकरिता नेमणूकीवर होता, त्यावरून त्याना महाडकरी म्हणू लागले. पुढे या महाडकरी शद्बाचाच महाडिक हा अपभ्रंश झालेला असावा. या महाडिकामध्ये कृष्णराव राजे महाडिक ह्या नावाचा पुरुष दाभोळची मोकदमी चालवित होता. तो १६१४ त मरण पावला. त्याच्या भावाचा नातू हरजी राजे महाडिक यास शिवाजी महाराजानी आपली मुलगी देऊन महाडिकांशी आपला शरीर संबंध जोडिला. व त्याला कर्नाटकच्या सुभ्याचे काम दिले होते ग्वाल्हेर संस्थानात सांप्रत असलेल्या प्रमुख सरदरा। श्रीमंत सरदार गोविंदराव महाडिक व श्रीमंत सरदार कृष्णराव महाडिक हे उभय बंधू आहेत.

साळुंखे ऊर्फ इंदप

हे घराणे साळुंखे वंशांतील असून ह्यांचा मूळपुरुष पुणे प्रांती इंदापूर गावी वास्तव्य करीत होता. त्यामुळेच त्यांना इंदप हे नाव प्राप्त झाले असावे. छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत ह्यांचा एक पुरुष साळसी महालातील कोळोशी गावी जकातीच्या वसूलाचे काम करीत असे. नंतर तोतयाचे बंड मोडण्याकरिता या इंदपाची नेमणूक झाली होती. त्यात त्याने बरीच मर्दुमकी गाजविली आहे. कोळोशी गावी इंदपांचा भव्य वाडा त्यांच्या गतवैभवाची अजून साक्ष देत आहे.

या साळुंखे वंशांत आज वैभव शिखरावर विराजमान झालेले पाटणकर साळुंखे हे एकच घराणे आहे. ते, ह्या घराण्याचा मूळ पुरुष

ज्योत्याजीराव ह्याच्या अचाट पराक्रमाचे स्मारक होय. सांप्रत ह्या घराण्यातील श्रीमंत सरदार भीमराव पाटणकर साळुंखे हे डेक्कन आणि कोल्हापूर प्रांतांतील पहिल्या वर्गाचे सरदार आहेत. ह्यांची एक शाखा ग्वाल्हेर व दुसरी हैद्राबाद संस्थानात वास्तव्य करीत आहे. ह्या दोन्ही शाखा वरील संस्थानात सरदार पदावर आरुढ आहेत. ह्या घराण्याची स्वतंत्र कैफियत प्रसिद्ध झाली आहे.

याशिवाय साळुंखे कुळातील, भिन्न भिन्न उपनावांची कुटुंबे रत्नागिरी जिल्ह्यात वास्तव्य करीत आहेत. परंतु त्यांच्या पूर्व पिठिके संबंधी माहिती न मिळाल्यामुळे त्यांची हकिगत येथे नमूद करिता आली नाही. त्याचप्रमाणे यादवानी चालुक्यांची सत्ता नामशेष केल्यावर त्यांचे राज्य महाराष्ट्रात सुमारे २०० वर्षे होते. पुढे मुसलमानांचा या देशात प्रवेश होऊन त्यानी यादवांची शेवटची गादी देवगिरी ही नष्ट केल्यावर चोहिकडे मुसलमानी अंमलाने कहर केला. तेव्हा यादव वंशजानी आपली नावे बदलून निरनिराळ्या प्रांतात वास्तव्य केले. त्यापैकी रत्नागिरी जिह्यात नायसी, हडकणी, धैवली वगैरे सहा सात गावी धाग या उपनावाचे यादव नांदत आहेत. मुसलमानी अंमलात प्रसिद्धीस आलेली अनेक मराठा घराणी रत्नागिरी जिल्ह्यात आहेत. त्यांचे कागदपत्र शोधून काढून त्यांचा संघटीत इतिहास लिहिणे बरेच खर्चाचे काम आहे, कोणी सधन गृहस्थाने मनावर घेतल्यास होऊ शकते.

रत्नागिरी येथील सावंत साळुंखे

यादवांची शेवटची गादी देवगिरी ऊर्फ दौलताबाद मुसलमानानी काबीज केल्यावर ह्या भाग्यशाली भारत वर्षाची अत्यंत शोचनीय अवस्था झाली होती. अंतःकलहामुळे हिंदुस्थानात यवनांचा अंमल पूर्ण बसला होता. वैभवशाली चालुक्य, चव्हाण व यादव या पराक्रमी वंशजांची राजसत्ता धुळीस मिळाली होती. एका काळी वैभव शिखरावर विराजमान झालेल्या या बलाढ्य वंशजांना अंतःकलहाच्या किडीनें पोखरल्यामुळे यवनाबरोबर सामना देण्याचे त्यांचे सामर्थ्य लयास गले होते. ज्या भरतभूमीत एका काळी सिंहनादालाही लाजविणाऱ्या वीरांच्या गर्जना ऐकू येत होत्या, तीच आम्हा आर्यांची पुण्यभूमी दुःखाने ओत प्रोत भरलेल्या निःश्वासाने व्यापून गेली होती. स्वाभिमानाची जागा हांजीखोरपणाने पटकाविली होती. यवनांच्या आसुरीलीलेने अगणित आर्यमहिला पातिव्रत्य संरक्षणाकरिता देहपात करीत

होत्या. अशा रीतीने हिंदुराजे आपले वैभव गमावून बसल्यामुळे त्यांच्या वंशजांचे पर्यावसान शेतकी व पाटिलकी यात होऊ लागले. कित्येकानी आपले सामर्थ्य आपल्याच बंधूचे गळे कापण्यांत व मुसलमानी साम्राज्याची भरभराट करण्यात खर्च केले ; तर कित्येक कूर्मरुप धारण करून व सेवाधर्मात आपला कठीण काळ कंठून क्षात्रतेजाचे संरक्षण करीत अनुकूल काळाची वाट पहात राहिले.

अशा स्थितीत बहामनी राज्य उदयास आले. ह्या राज्याची पूर्व पिठीका विलक्षण आहे, ती अशी की, दिल्ली येथे महमद तुघ्लख याजपाशी गंगू या नावाचा एक ब्राह्मण अप्रतीम जोतिषी होता. त्य ब्राह्मणाचे पदरी हसन या नावाचा एक मुसलमान गुलाम असे; त्याच्या दैवावरून हा मोठा कर्तृत्ववान निपजेल असे त्या ब्राह्मणास वाटून त्याने त्याची गुलामगिरीतून सुटका केली आणि महमद तुघ्लखापाशी शिफारस करून त्याचा दरबारात प्रवेश करून दिला, तेव्हा हळूहळू त्याची कर्तबगारी बादशहाच्या नजरेस येऊन, त्याने त्याला मोठ्या योग्यतेस चढविले, आणि जाफरखान हा किताब देऊन दक्षिणेच्या फौजेचे आधिपत्य त्याजकडे दिले. पुढे महमद तुघ्लखाच्या कारकिर्दीत बंडे उपस्थित झाली, तेव्हा हसन जाफर खानाने स्वतंत्र राज्य स्थापून आपली राजधानी कलबुर्गा येथे केली; व आपणाला गंगू ब्राह्मणाच्या साहायाने हे वैभव प्राप्त झाले म्हणून त्याने आपल्या राज्याला ब्राह्मणी ऊर्फ बहामनी हे नाव देऊन त्या गंगू ब्राह्मणाला आपला खजिनदार नेमिले, ही गोष्ट इतिहास प्रसिद्ध आहे.

बहामनी राज्याच्या कारकिर्दीत हिंदूवर जुलूम होत नसे. तो त्यांच्या शौर्यादि गुणांचा आदर करी; व त्यांजवर विश्वासाने मोठमोठी राजकारणातील कामे सोपवी, आणि हिंदुधर्मासंबंधाने विशेष काळजी घेऊन, समतेने वागे. त्यामुळे उत्तरेकडील कडव्या मुसलमान बादशाहीला कंटाळून हताश झालेले राजवंशीय व इतर थोर मराठा घराण्यातील क्षत्रिय वीरानी आपले गुप्तक्षात्रतेज हळूहळू प्रकट केले आणि तुर्क व अफगाण या जुलमी बादशाहांचा पक्ष घेणाऱ्या लोकांचा व त्यांच्यातर्फे लहान सहान बंडे करून बहामनी राज्याला त्रास देणाऱ्या बंडवाल्यांचा पराभव करून बहामनी राज्याचे संगोपन करण्याचे कार्य केले. या क्षत्रिय वीरात एका काळी दक्षिणेत सुमारे सहाशे वर्षे साम्राज्याचा उपभोग घेणाऱ्या महाप्रतापी चालुक्य वंशाचा कल्याण नगरीचा

शेवटचा राजा चौथा सोमेश्वर पदभ्रष्ट होऊन अज्ञातवासात होता, त्याचे वंशज उदयास आले. या चालुक्य ऊर्फ साळुंखे सरदारांच्या कर्तबगारीने बादशहा खुष होऊन त्याना दंतगिरी आणि गुणवंतगड या परगण्याची त्याने देशमुखी दिली. अशा रीतीने अज्ञातवासात असलेल्या या कुळाचा उदय होण्याचे चिन्ह दिसू लागले. पुढे इसवी सन १५२६ च्या सुमारस बाहामनी राज्याच्या अव्यवस्थेमुळे त्याचे पाच भाग झाले. त्यापैकी आदिलशाहीच्या (विजापुरचे राज्य) पदरी वरील साळुंखे सरदार या नात्याने राहिले. सुलतान युसफ आदिलशहाने विजापूर येथे ज्या वेळी राज्याची स्थापना केली; त्यावेळी त्याच्या ताब्यात नीरा नदीपासून घटप्रभा नदीपर्यंत व पश्चिम किनाऱ्यावरील बाणकोटपासून रामेश्वर पर्यंत कोकणपट्टी, पूर्वेकडे रायचूर, इदगिर, बेदर आणि मलकार वगैरे परगणे, इतका मुलुख होता. या मुलुखाचा बंदोबस्त करण्याकरिता अनेक मराठे सरदार बादशहाने सरंजामासह पाठविले होते. त्या सरदार समूहातच दंतगिरी आणि गुणवंतगडची देशमुखी असलेले चालुक्य ऊर्फ साळुंखे सरदारांची नेमणूक झाली, तेव्हा त्यानी सातारा जिल्ह्यातील पाटण परगणा काबीज करून तेथील बंदोबस्त केला; त्या पैकी काहीजण कोकणप्रांती रत्नागिरी मुक्कामी आले व त्यांनी आदिलशाहीच्या विरुद्ध असलेली लहानसहान बंडे मोडून तेथील आसपासचा प्रदेश आपल्या ताब्यात घेतला; व तेथे आपले वास्तव्य केले, असे एका जुन्या बखरीत लिहिलेले आढळते. सदरहू बखरीतील उतारा वाचकांचे माहितीसाठी खाली देत आहो, "विजापूरचे कल्याण सुभ्याहून प्रतापराव, हंबीरराव व जगपाळराव बीन तुकोजीराव साळुंखे ५००० फौजेसह स्वारीस निघून, साताराप्रांती आले; व त्यांनी पाटण परगणा सर केला. त्यातील सर्वात लहान भाऊ जगपाळराव याच्या अतिशौर्यामुळे त्यास फारच थकवा आला होता, सबब जिंकिलेल्या प्रांताची व्यवस्था राखण्यास त्यास तेथेच ठेऊन प्रतापराव व हंबीरराव हे उभयबंधू फौजेसह कोकणप्रांताचा बंदोबस्त करीत रत्नागिरी येथे आले, व त्या ठिकाणी लहानसे ठाणे बांधून राहिले. पुढे लाहानशी चकमक झडून त्यात हंबीरराव पडले तरी प्रतापराव मुळीच डगमगले नाहीत. त्यानी त्या ठिकाणी आपल्या जोगेश्वरी कुलस्वामिनीची स्थापना करून, देवळासमोर आपल्या बंधूचीही स्थापना केली. तो देखावा अद्याप तसाच आहे."

वरील बखरीतील उतारा पाटणकर साळुंखे घराण्याच्या कैफियतीत पृष्ठ ९६ मध्ये प्रसिद्ध झाला असून, त्यात नमूद केलेल्या हकिगतीत व आमच्यापाशी उपलब्ध झालेल्या कागदपत्रात बरीच साम्यता दिसून येते. इ. स. १५२६ च्या सुमारास बहामनी राज्याचे तुकडे झाले. वास्तविक त्याला पंधराव्या शतकाच्या अखेरीपासून उतरती कळा लागली होती. त्या राज्याचा मुख्य प्रधान महमद गवान अत्यंत मुत्सद्दी व निःस्पृह होता. तो कोणाला लाच खाऊन देत नसे, त्यामुळे दुसरे अनेक सरदार त्याच्यावर बिथरले व त्यानी त्याचा खून केला. त्या वेळेपासून त्या विस्तारयुक्त राज्याच्या ऱ्हासाला सुरवात झाली व अव्यवस्थेमुळे तंटेबखेडे उपस्थित झाले. पूर्वीच्या सुलतानानी मुख्य मुख्य प्रांतावर जे सुभेदार नेमिले होते, तेच बलीष्ठ होऊन त्या त्या प्रांतांचे स्वतंत्र राजे झाले. अशारीतीने बहामनी राज्याचे इ. स. १५२६ मध्ये पाच भाग झाले. तेव्हा लहानसान बंडे होत, ती मोडण्याकरिता आदिलशाहीच्या (विजापूर दरबारच्या) वतीने अनेक मराठे व मुसलमान सरदारांची नेमणूक झाली होती. त्यात सोरबाजी साळुंखे यांचे वंशज तुकोजीराव व रामराव या बंधूद्वयांची फौजेसहवर्तमान सातारा व कोकणपट्टीतील काही भागाच्या बंदोबस्ताकरिता मोकासेदार * या नात्याने

* कॅप्टन ग्रांट डफ् साहेब याच्या मूळ इंग्रेजी ग्रंथाच्या आधाराने कॅ. डेविड कॅपन याने लिहिलेली मराठ्यांची बखर पृष्ठ ११, ब्राह्मणी राज्याच्या झालेल्या पांच भागाची त्या वेळेची राज्य पद्धती:– ' मोठे सरकार, त्यामध्ये परगणा, त्याचे आत कर्यात तिचे पोटी संमत, तिचे मध्ये महाल, त्याचे आत तालुका या खेरीज हिंदी नावे दोन प्रांत आणि देश अशी होती. दुसरी राज्यात-अशी रीति होती की, लहानमोठा मामला मखत्याने सांगावा,, कदाचित कोणी मखता न केला तर बहुतकरून हिंदुलोकास द्यावा. मखत्याचा पंका घेणे व मुलखात चौकी पहारा इत्यादी बंदोबस्त ठेविणे व मुलखाचे सीमेसंबंधी खटले असल्यास त्याची चौकशी करणे, या इतक्या कामावर बादशहाच्या दरबारातून एके एके जागी अमील नामे एक कारभारी ठेवित. त्या कारभाऱ्याने वतनसंबंधी अथवा लोकांचे भाऊबंदकीचे वगैरे दुसरे काही खटले असल्यास त्याची पंचाईत करून पंचाचे विचारानुरुप करावे; जातीने मनास आणू नये. विजापूरचे राज्यात एक मोठा अमील होता. त्याचे नाव मोकासेदार ठेविले असे' आणि दुसरे अमील त्याचे आज्ञेत वागत असत. असे कित्येक मोकासेदार वीस तीस वर्षे कामावर होते. त्यांत कोणी मेला असता त्या कामावर त्याच्या पुत्रास ठेवावे, अशी चाल होती. काकी मोकासेदारास त्या द्रव्याचा कांही विभाग होता. कित्येक वेळा एका वर्षात मोकासेदार पहिला दूर करून दुसरा ठेविला असे

नेमणूक झाली. त्या वेळी तुकोजीराव यांस प्रतापराव हंबीरराव जगपाळराव व महाकाळ असे चार पुत्र होते. त्यात महाकाळ हा त्यावेळी अगदी अल्पवयी असावा असे वाटते. आणि म्हणूनच बखरीमध्ये त्याचा उल्लेख नाही. तुकोजीराव यानी प्रथमतः सातारा प्रांतातील धामधूम मोडून, त्या प्रांताची देखरेख करण्याकरिता आपला तिसरा पुत्र जगपाळराव यास पाटण परगण्यात फौजेसह ठेऊन, आपण निवडक लोकांसह पुढील बंदोबस्ताकरिता निघाले त्यावेळी रत्नागिरी येथे अनंतसिंग हा सुभेदार होता. त्याने बहामनी राज्याच्या अव्यवस्थेचा फायदा घेऊन व जलमार्गाने लुटालूट करणाऱ्या चाचें लोकाना सामील होऊन लहानसान बंडे व लुटलूट करण्याचा उपक्रम केला होता. तेव्हा तुकोजीरावाने प्रथम आपला मोर्चा रत्नागिरीकडेच वळविला, आणि रत्नागिरी किल्ल्यावर अचानक छापा घातला. त्या हातघाईत तुकोजीराव यांचा कनिष्ठ बंधू रामराव व पुत्र हंबीरराव हे दोघे वीर कामास आले. तरी त्यांनी कच न खाता निकराची लढाई करून व अनंतसिंह याचा पूर्ण पराभव करून त्याला कैद केले. आणि विजापुरास बादशहाकडे रवाना केले. तेव्हा बादशहा खुष झाला व रत्नागिरी येथील बंदोबस्ताचे काम त्यांच्याकडे सोपवून रत्नागिरी व आसपासचा प्रदेश त्यांच्या तैनातीला नेमून दिला. हे पुढे दिलेल्या परिशिष्ट नं. ३ ते ६ वरून वाचकांच्या लक्षात येईल. तदनंतर तुकोजीरावानी आपले ठाणे * रत्नागिरी येथ बांधून आपल्या कुलस्वामीनी जोगेश्वरीचीही स्थापना केली व तिच्या देवालयासमोर आपल्या रणांगणी पतन पावलेल्या बंधूचे स्मारक म्हणून एक त्याची प्रतिमा कोरलेली लहानशी शीळा बसविली. अजूनही ते दृश्य पहावयास मिळते. 'आता वर नमूद केलेल्या बखरीच्या उताऱ्यामध्ये ती शीळा हंबीररावाची आहे, असा

झाले. आणखी मोकासेदारी निरंतर मुसलमानासच द्यावी असे नव्हते, कधी कधी सुभा मोठा असे परंतु सुभ्याने नेहमी त्या प्रांती नसावे, बहुदा दरबारीच असावे. त्याने मुलूखाचे वसूलाचे काम न करावे, परंतु त्याचे मुलूखाचे दप्तरावर त्याची सही घ्यावी लागत असे. "

वरील बखरीतील उताऱ्यात मोकासेदार व सुभेदार हे जवळजवळ सारख्याच योग्यतेचे दिसतात. रत्नागिरी येथील सावंत साळुंखे यांचे पुर्वज तुकोजीराव हे त्यापैकी एक होते हे उपलब्ध कागदपत्रावरून स्पष्ट दिसते.

* वरील रत्नागिरी येथे बांधिलेल्या ठाण्याचा आता फक्त चौथरा शेष राहिला आहे व त्याला चौकी असे म्हणतात.

उल्लेख आहे. परंतु ही गोष्ट शक्य दिसत नाही; कारण प्रस्तुत ग्रंथात जोडीलेल्या परिशिष्ट नं. १३ मध्ये म्हटले आहे की " रामराव पडला. त्याची बायको सती गेली. " ह्या सतीचे स्मारक रत्नागिरी किल्लचामध्ये असून त्याच्यावर कोरिलेल्या प्रतिमेत व वरील देवळासमोरील शिळेवरील प्रतिमेत बरीच साम्यता दिसून येते. तेव्हा ती शिळा रामरावाचेच स्मारक असली पाहिजे, हे निर्विवाद सिद्ध होते. हंबीरराव याचेहि स्मारक त्या ठिकाणी कोठे तरी असले पाहिजे; परंतु ते आज आमच्या दृष्टीपथाच्या बाहेर आहे. आता पाटण येथील व्यवस्था पहावयास राहिलेले तुकोजीरावांचे तिसरे पुत्र जगपाळराव यांचेच वंशज पुढे इ. स. १५७२ च्या सुमारास स्वकर्तबगारीने उदयास येऊन, पाटण महालासह साठ गावची देशमुखी मिळविलेले ज्योत्याजीराव असले पाहिजेत, हे वरील बखरीच्या आधाराने निश्चित होते. त्याच वैभवशाली घराण्यात श्रीमंत सरदार भीमराव पाटणकर साळुंखे हे डेकन आणि कोल्हापूर संस्थानातील पहिल्या वर्गातील सरदार आहेत.

तुकोजीराव यांचे ज्येष्ठ पुत्र प्रतापराव हे बहुदा संगमेश्वराकडील बंदोबस्त करावयास गेले असावेत असे आमच्याकडील कागदपत्रांच्या सूक्ष्म निरिक्षणांती आढळून येईल; ते असे की, रत्नागिरी येथील सावंत साळुंखे यांची सत्ता पुढे रामराव देशमुख या नावाच्या बलीष्ट सुभेदाराने हिराऊन घेतल्यामुळे रत्नागिरी येथील सावंत साळुंख्यांनी सुभेदार रामराव ह्याच्याशी सडेतोड सामना दिला आहे. त्याचा खुलासा पुढे होईलच. तेव्हा त्या सामन्यात त्याना अत्यंत कष्ट सोसावे लागले, इतकेच नव्हे तर परागंदाहि व्हावे लागले. त्यावेळी रत्नागिरी येथील वतनाचा कारभार चालविण्याकरिता संगमेश्वर तालुक्यात शृंगारपुरी सुर्व्यांच्या पदरी असलेले पीलाजीराव साळुंखे यास तेथून बोलावून रत्नागिरी येथील वतनाचा कारभार त्या वतनाचे वारस म्हणून त्यांच्याकडे सोपविला, व ह्या गोष्टीला रत्नागिरी येथील सावंत साळुंखे यांचे मिऱ्या, शिवरे व नाचणे या गावी नांदत असलेले वंशज, यानी संमत्ती दिली व तो भाऊबंद आहे, असे म्हटले आहे. * त्या आर्थी प्रतापराव हे संगमेश्वराकडे बंदोबस्तास गेले असावे आणि त्याचाच वंशज वरील पिलाजीराव साळुंखे हा असला पाहिजे. शिवाय संगमेश्वरपासून सुमारे १४ मैलावर आंगवली गावी साळुंखे ऊर्फ अणेराव हे नांदत आहेत. त्यांची संक्षिप्त हकिगत मागे आलीच आहे. ते आपणाला पाटणकर साळुंख्यांचे वंशज म्हणवितात व पाटणकर साळुंखे

रत्नागिरी येथील सावंत साळुंखे यास आपले भाऊबंद आहेत असे म्हणतात. आणि या दोन्ही गोष्टी पाटणकर साळुंखे घराण्याच्या कैफियतीमध्ये प्रसिद्धही आहेत. तेव्हा पाटणकर साळुंखे, सावंत साळुंखे व अणेराव साळुंखे या तिन्ही घराण्यात वंशपरंपरेने चालत आलेल्या वरील नात्यासंबंधी दंतकथेचा सूक्ष्म रीतीने विचार केल्यास, तुकोजीराव यांचा ज्येष्ठ पुत्र व जगपाळराव पाटणकर यांचा वडील बंधू प्रतापराव हाच कुंडी घाटानजिक महिपत गडावर सरदार असलेला अणेराव साळुंखे यांचा मूळ पुरुष असला पाहिजे. आणि मग प्रतापराव, जगपाळराव व महाकाळराव साळुंखे या तिन्ही सख्या भावांचे वंशज सांप्रत अनुक्रमे आंगवली, पाटण आणि रत्नागिरी येथे नांदत आहेत, असे म्हणणे भाग पडते.

रत्नागिरी किल्ल्यात अनंतसिंहावरोबर झालेल्या लढाईत पडलेल्या रामरावाची पत्नी रत्नागिरी किल्ल्यातच सती गेली. तिचे स्मारक अजूनही अस्तित्वात आहे व तें ज्या ठिकाणी आहे त्याच ठिकाणी रामराव हे पडले, अशी परंपरेपासून बोलवा आहे. शिवाय तुकोजीराव यांनी वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे जोगेश्वरीच्या देवालयासमोर आपल्या रणांगणी पतन पावलेल्या भावाचे स्मारक म्हणून एक लहानशी शिळा देवळाच्या पुढील बाजूच्या कोनावर बसविली आहे. या शिळेवर एक हत्तीचे चित्र कोरले असून रामराव हत्तीवर चाल करून जात आहे, असे दाखविले आहे. परंपरेने चालत आलेल्या माहितीवरून असे समजते की, अनंतसिंग किल्लेदाराने आपल्या हत्तीसह रामराव याजवर चाल केली, तेव्हा रामराव हे मोठ्या शौर्याने त्या मदनमस्त हत्तीवर सिंहाप्रमाणे झडप घालून त्याला परतविण्याचा प्रयत्न करीत असता कामास आले. यावरून त्या असामान्य वीराच्या शौर्याची व धैर्याची कल्पना होते. असे पराक्रमी पुरुष या चालुक्य ऊर्फ साळुंखे कुळात अनेक झाले आहेत, हे प्राचीन इतिहासावरून स्पष्ट दिसून येते. रत्नागिरीच्या किल्यात असलेल्या सतीस्मारकावरही सिंहाने हत्तीवर झडप घातली आहे, असे चित्र कोरिलेले आढळून येते. यावरून रामरावाने केलेल्या पराक्रमाची परंपरेने चालत आलेली माहिती निःसंशय खरी असली पाहिजे.

* पुढे पील सावंत याच्या वंशजानी परिशिष्ठ नं. ५ मध्ये असेही म्हटले आहे की, आम्ही एका भावाचे वंशज व तुम्ही रत्नागिरी शीवरे नाचणे व मिऱ्या येथील सावंत साळुंखे एका भावाचे वंशज. पान नं. १६ पहा.)

या सावंत साळुंखे सरदारांची सत्ता पुढील तीन चार पिढयातच संपुष्टात आल्याचे दिसून येते. आदिलशाहीच्या वेळी निरनिराळ्या प्रांतावर नेमलेले सुभेदार कधी कधी बलीष्ठ होऊन सुलतानाला न जुमानता त्यांच्याकडे सोपविलेल्या प्रांताचा कारभार स्वतंत्रपणे करीत असत. त्यावेळी दाभोळ प्रांती विजापूर दरबारच्या वतीने * रामराव बाळाजी देशमुख या नावाचा एक बलिष्ठ सुभेदार असल्याचे आढळून येते. काही काळाने त्याने राजापूर प्रांतही आपल्या ताब्यात घेतला. व त्यानेच रत्नागिरी येथील सावंत साळुंखे सरदारास फक्त सालिना ५०० लारीची × विजापुरच्या दरबारामार्फत नेमणूक करून

---

* रामराव देशमुख हा ज्याने जयगड व संगमेश्वर प्रांतातील बंडे मोडून त्या प्रांताची आदिलशाहीच्या वेळी देशमुखी व कोकणराव हा किताब मिळविला त्या कान्होजीराव चव्हाणचा वंशज आहे, असे चव्हाण घराण्याच्या उपलब्ध कागदपत्रावरुन दिसते. या कान्होजीराव चव्हाणाचे वंशज सांप्रत रत्नागिरी जिल्ह्यात पाटपन्हाळे, कळंबुशी, येगाव व उभले वगैरे गावी आज नांदत आहेत. विशेष खुलाशाकरिता पा. नं. १६ पहा.

***Lari :—** (From Hobson's dictionary) Was issued by Adilshahi King. Lari is a Persian word, a peculiar kind of money used in the Persian Gulf on the west coast of India and in the Maladiv Islands where it survived to the present century (1900). the name is still retained there. Tavernier (a foreign traveller) gives the value of it in the Persian Gulf (1563). I have seen them sold for ten or eight Laris which may be our money 13s d. An ox or cow was sold for one Lari. Lari is also a name for Gujrath. Lari was an unstamped long piece of silver of a fiixed weight.

भारताचार्य चिंतामणराव वैद्य याचे मतः— " लारी हे नाणे फक्त पश्चिम किनाऱ्यावर गुजराथेपर्यंत चालू होते. दक्षिण गुजराथ प्रांत पूर्वी लाट या नावाने प्रसिद्ध होता, या लाटराजांचे राज्य पश्चिम किनाऱ्यावर गोव्यापर्यंत होते, आणि तेथे हे नाणे चालू होते म्हणून त्यास (लाट–लाड) लाडी हे नाव पडले. व त्या लाडीचा अपभ्रंश लारी असावा. आदिलशाहीचे राज्य कोकणात झाले तेव्हा त्याने कोकणप्रांता-

देऊन त्यांची सत्ता नाहीशी केली. अशा रीतीनें त्यांची सत्ता नाहीशी झाल्यामुळे साहजिकच त्यांच्यामध्ये बरीच खळबळ उडाली; व ते कधी उघडपणे तर कधी गुप्तपणाने सुभेदाराची सत्ता उलथून पाडण्याची कारस्थाने करू लागले. त्याचा परिणाम असा झाला की, सालिना मिळत असलेल्या पाचशे लारीची नेमणूकही सुभेदाराने बंद केली. पुढे जोडलेल्या परिशिष्ट नं. ५ यात म्हटले आहे की, विजापूरची पादशाही मोडत आली व म्हणून नक्त नेमणूक बंद झाली. या विधानाचा व सुभेदाराने नेमणूक बंद केल्याचा कार्यकारणभाव लक्षात आणला तर बादशाही हुकुमाला न जुमानता त्याने करून दिलेली नेमणूक बंद करण्याइतके सामर्थ्य त्यावेळी सुभेदाराच्या आंगी असले पाहिजे, असे अनुमान करण्यास हरकत नाही. नेमणूक बंद झाली त्यावेळी गण सावंत साळुंखे यांचे पुत्र तान सावंत साळुंखे हे रत्नागिरी येथील कारभार पहात असत, ते सुभेदाराची सत्ताही मानीतनासे झाले. ही गोष्ट नेवरे येथे असलेल्या सुभेदाराच्या महालकऱ्याने सुभेदाराला कळविली. तेव्हा सुभेदाराने महालकरी यास तान सावंत साळुंखे ह्यांचे

करिताच लारी ही नाणी पाडिली. वास्तविक आदिलशाहीच्या घाटावरील राज्यात होन हे सुवर्ण नाणे चालू होते. लारीची किंमत हल्लीच्या हिशेबाने बारा आण्यापासून एक रुपयापर्यंत दिसते. आणि वरील हाब्सनच्या कोशात एका पाश्चात्य प्रवाशाने लिहिले आहे की, एका लारीला त्यावेळी एक गाई विकत मिळत असे, त्यात आश्चर्य नाही. आमच्याकडे गोप्रदानाचा सव्वा रुपया दिला जातो, तो त्या वेळेच्या हिशेबाने योग्यच आहे. " केतकर आपल्या ज्ञान कोशात म्हणतात की, लारी हे एक लांबट आकाराचे आरेबिक नाणे असून त्याची किंमत आदिलशाही अर्धा रुपया आहे.

हाब्सन याने दिलेली लारी या नाण्याची उपपत्ती व भारताचार्य चिंतामणराव वैद्य यानी त्याविषयी केलेले विधान यांचा विचार करिता ते नाणे गुजराथ प्रांतात चालू होते व हाब्सनही ते कबूल करतो त्याअर्थी वैद्य प्रभृतिनी लाट या शब्दावरून लाविलेली त्याची उपपत्ती संयुक्तिक दिसते. हल्लीच्या हिशेबावरून लारीची किंमत रुपयापेक्षा जास्त होईल. म्हणजे त्यावेळी रत्नागिरी यथील सावंत साळुंखे ह्यांना सुमारे ६०० रुपयांची नक्त नेमणूक रामराव सुभेदाराने त्यांची सत्ता आपल्या हाती घेतल्यावर विजापूर दरबारतर्फे करून दिली.

पारिपत्य करून त्यांचेकडे राहिलेल्या जमीन वसूलाची रक्कम वसूल करण्याचा हुकूम केला. ही बातमी तान सावंत साळुंखे यांस समजताच त्यानी महालकरी देसक ह्याचा सूड उगविण्याचा निश्चय केला, आणि आपले भाऊबंद व इतर काही माणसे मदतीला घेऊन महालकरी याजवर नेवरे मुक्कामी चाल करून गेले. परंतु ही बातमी महालकरी देसक ह्यास त्याच्या हेराकडून आगाऊच समजली; तेंव्हा त्याने आपल्या निवडक लोकांसह तान सावंत साळुंखे याचे बरोबर सामना देण्याकरिता नेवरे मुक्कामाहून कूच केले. दोन्ही बाजूकडील लोकांची गाठ मौजे आरे येथे पडून त्या ठिकाणी निकराची लढाई झाली व देसक महालकरी याचे मनुष्यबळ ज्यास्त असल्यामुळे त्यांचे पुढे तान सावंत साळुंखे यांच्या लोकांचे काहीएक चालले नाही. व स्वत: तान सावंत साळुंखे त्या चकमकीत मारले गेले.

तान सावंत साळुंखे * झाडगावच्या साळुंखे घराण्यापैकी होते. त्यानी बंड केले त्यावेळी त्यांचे चुलते नाग सावंत, अंत सावंत व भोळ सावंत साळुंखे हे रत्नागिरी येथे होते. त्यांचा सुभेदाराकडून छळ होईल ह्या भीतीस्तव ते जयगड व पन्हाळा प्रांती परागंदा झाले. त्यावेळी जयगडपर्यंत पश्चिम समुद्र किनारा शिवाजी महाराजानी काबीज केला होता; व पन्हाळा प्रांतही महाराजांच्या ताब्यात होता. पश्चिम किनाऱ्यावर महाराजांचा दर्यावर्दी प्रमुख सरदार आंग्रे सरखेल याचा तावा होता तेंव्हा वरील झाडगावकर साळुंखे बंधूनी रामराव सुभेदाराच्या अरेरावी सत्तेपासून बचाव करण्याच्या हेतूने परागंदा होऊन, महाराजांच्या फौजेत जयगड व पन्हाळा प्रांती नोकरी धरली, हेतू हा की, एक तर तान सावंत साळुंखे यानी देसकाबरोबर आरे मुक्कामी दिलेल्या सामान्यामुळे त्यांचा रामराव सुभेदाराकडून छळ होण्याचा संभव होता तो टळावा, व दुसरा शिवाजी महाराजांच्या पक्षाला आपण मिळून असलो, तर संधि मिळाल्यास आपली सत्ता नामशेष करणाऱ्या सुभेदारावर सूड उगविता यावा. व त्याप्रमाणे तान सावंत साळुंखे यांचे पुतणे आबाजी सावंत साळुंखे ह्यांचेकडून तसा प्रयत्न झालाही

अशा रीतीने झाडगाव येथील सावंत साळुंखे परागंदा झाल्यामुळे मिऱ्या येथील सावंत साळुंखे यांनी आपला वारस हक्क सांगून सुभे-

* हा रत्नागिरीचा एक भाग आहे. व तेथे या सावंत साळुंख्याचा मुळ पुरुष तुकोजीराव याने ठाणे बांधिले.

दाराकडे अर्ज केला व त्याच्या परवानगीने तेथील जमिनीचा कारभार पाहू लागले. कालांतराने झाडगावपैकी परागंदा असलेले अंत सावंत ह्यांचे नातू हर सावंत हे झाडगावी परत आले आणि झाडगाव येथील कारभार पाहू लागले. परंतु थोडक्याच दिवसानी ते मृत्यू पावल्यानंतर पुन्हा झाडगावच्या वतनावर कोणी नाही असे पाहून, मिरकर सावंत साळुंखे ह्यांनी ते आपल्या ताब्यात घेतले, आणि त्याचा कारभार आपल्या वतीने अंतभट खंडकर याजकडे सोपाविला. हे पाहून महालकरी देसक * यास बरे वाटले नाही. हे देसक ऊर्फ देसाई त्याकाळी नेव्हरे येथे अधिकाराच्या जागेवर असून मोठे कारस्थानी व वजनदार गृहस्थ असत, असे दिसून येते. त्यावेळी महालकऱ्याच्या अधिकारावर असलेल्या देसकानी निराळीच मसलत करण्याचा घाट घातला. संगमेश्वर प्रांतात वास्तव्य करीत असलेले प्रतापरावाचे वंशज म्हणजे रत्नागिरी येथील सावंत साळुंख्यांच्या अवशेष बंधूपैकी पिलाजी राव सावंत साळुंखे या नावाचे एक शृंगारपूर येथे + राजे सुर्वे

* या देसक ऊर्फ देसाई यांचा मूळ पुरुष चंदरसिंग ऊर्फ चंद्रराव हा आदिलशाहीच्या वेळी कोल्हापूरच्या बाजूने कोकणांत आला; व शृंगारपूरच्या राजाच्या पदरी राहिला. ह्याच चंद्ररावाचा पणतू जैतसिग ह्याने स्वकर्तबगारीने देशमुखी मिळविली असे त्याच्या पुरातन वंशावळीवरून दिसून येते. व त्यावेळेपासून त्यांना देसक ऊर्फ देसाई ही पदवी मिळाली असली पाहिजे आता ते आपणाला सावंत देसाई म्हणवितात. वरील चंद्ररावाला लोनसिंग हा एकच मुलगा होता. त्याचे उदरी हरीसिंग, मानसिंग व गुणसिंग असे तीन पुत्र झाले. पैकी हरीसिंग ह्याने आपले वास्तव्य हातखंबे येथे केले. दुसरा मुलगा मानसिंग ह्याचे वंशज सांप्रत विळे, मेढे, माजरे, कोंडे, तरवळ, उकशी आणि फुणगुस ह्या गावी नांदत आहेत. तिसरा मुलगा गुणसिंग ह्याचे वंशज ओरी, खेडशी देऊड व धामणशे ह्या गावी वास्तव्य करीत आहेत.

\+ राजे सुर्वे हे बहामनी राज्याच्या वेळी कोकण प्रांती आलेले दिसतात, हें परिशिष्ठ नं. १६ वरून आढळून येईल. त्यावेळी त्यांची ठाणी राजापूर प्रांतात प्रभानवली व शृंगारपूर येथे होती. बहामनी सुलतानाने त्याना कोणकप्रांती आणून बरीच मोठी जहागिरी दिली होती, हे वरील परिशिष्ठात स्पष्ट नमूद केले आहे. हे चव्हाण देशमुख यांच्या पूर्वी पाच सात वर्षे इकडे आले आहेत. या घराण्यातील नागोजी राजे सुर्वे हे त्यावेळी प्रभानवली यथे बंदोबस्ताचे काम करीत होते. त्यांचे मुख्य ठाणे शृंगारपूर येथेच होते. पुढे शिवाजी महाराजांच्या उदयकाळी शृंगारपूर हे राजे शिर्के यांच्या ताब्यात गेले असे दिसते. सांप्रत राजे सुर्वे यांचे वंशज रत्नागिरी जिल्ह्यातील कुंभारखाणी, कुचांबे, पाचांबे वगैरे गावी नांदत आहेत.

यांचे पदरी नोकरीला होते. त्यांना सुभेदाराकडून पत्र पाठवून बोलवून आणविले. आणि त्यांना झाडगावच्या वतनाचा वारस ठरवून गावचा कारभार त्यांचे स्वाधीन केला. पिल सावंत हे संगमेश्वर प्रांतातील मूळ भावबंदातलेच असल्यामुळे त्यांना झाडगाव येथील वतनाचे वारस ठरविताना मिरकर सावंतही आड आले नाहीत. उलटपक्षी त्यानी त्याकामी पिल सावंत यांस मदतच केल्याचे दिसून येते. पिल सावंत यांचेकडे अशा रीतीने जरी गावचा कारभार सोपविण्यात आला तथापि त्यांच्याने फार दिवसपर्यंत तो करविला नाही. उलट कर्जबाजारी होऊन त्यांना फार हाल सोसावे लागले व पुढे त्यांचा अंत झाला. मध्यंतरी जैगड येथे परागंदा असलेल्या भोळ सावंत साळुंखे याचा नातू आबाजीराव याने येऊन झाडगावचा कारभार कांही काळ चालविलेला आढळून येतो परंतु तान सावंत बीन गण सावंत याने सुभेदाराविरुद्ध दिलेल्या सामन्यामुळे झाडगाव येथील सावंत साळुंखे व सुभेदार रामराव ह्यांच्यामध्ये वैर उत्पन्न झाले होते. कालावधीने ते सत्कृद्दर्शनी शमल्यासारखे भासत होते. तरी त्याचे बीज दोघांच्या अंतःकरणातून समूळ नाहीसे झाले नव्हते. त्यामुळे आबाजीराव यास झाडगाव येथील कारभार चालविण्यास अनुकूल परिस्थिती प्राप्त झाली नाही. शिवाय सुभेदाराने शृंगारपूराहून पिलाजीराव साळुंखे ह्यांस आणून आपल्या झाडगावच्या वतनावर आणखी एक भागिदार केल्यामुळे पूर्वीचे वैर पुनः दुप्पट जोराने वाढले. आणि आपला सर्वस्वी नाश करणाऱ्या सुभेदाराला चांगलाच हात दाखवावयाचा आबाजीरावानें निश्चय केला. त्याने संधी साधून जैगडास पुनः प्रयाण करून शिवाजी महाराजांच्या आंग्रे सरखेल सरदाराबरोबर रत्नागिरी येथील सुभेदाराची सत्ता उलथून पाडण्याचे कारस्थान केले. आणि एका रात्री निवडक लोकांनिशी रत्नागिरी किल्ल्याला शिड्या लाऊन छापा घातला. परंतु दुर्दैवाने आंग्रे सरखेलकडील लोकांचा मोड झाला.

किल्ला फितूर करण्याच्या मुळाशी आबाजीराव होता, ही गोष्ट सुभेदार यास समजताच त्याने मोठ्या युक्तिने आबाजीराव यास त्यांच्या संबंधी लोकांकडून मिऱ्या नजिक काळबादेवी गावी आणवून पकडले व देहांत शासन केले; ही गोष्ट मिऱ्या, शिवरे व नाचणे येथील भाऊबंदाना समजताच त्यानी सुभेदाराला विनंती अर्ज करून आबाजीच्या शवाला अग्निसंस्कार दिला. त्यावेळी आबाजीराव यांची

स्त्री जयगड येथे होती. तिला आबाजीचे निधनवृत्त कळताच ती जयगड येथेच सती गेली. ही गोष्ट सुमारे ३०० वर्षापूर्वीची असल्यामुळे, जयगड किल्ल्यानजिक अस्तित्वात असलेल्या सुमारे ३३ सती स्मारकामध्ये आबाजीरावाच्या स्त्रीचे सती स्मारक कोणते ते निश्चित स्वरुपात दाखविणे जरी दुरापास्त आहे, तरी वरील स्मारके लक्षपूर्वक पाहिली असता असे आढळून येईल की, वर नमूद केलेल्या स्मारकात शंकराची पिंडी असलेले एकच स्मारक आहे व तेच आबाजीराव याच्या स्त्रीचे असावे असे वाटते. कारण शंकर हे साळुंख्याचे कुलदैवत आहे; व ह्या साळुंखे घराण्याच्या इतर सती स्मारकांवरही शंकराच्या पिंड्या आहेत. आबाजीराव हा झाडगावपैकी सावंत असून त्याने किल्ला फितूर करविण्याचा प्रयत्न केला, म्हणून सुभेदार रामराव याने झाडगावचे सर्व वतन जप्त केले व जमीनजुमला त्यावेळी सुभेदाराच्या नोकरीत असलेल्या व रत्नागिरी किल्ल्यात नांदत असलेल्या मराठ्यांच्या स्वाधीन केला. आमच्या कागदपत्रात वरील मराठ्याना नायकवडी म्हटले आहे. नायकवडी हा नायकवारी या तत्कालीन पदवीचा अपभ्रंश आहे, असे इतिहासावरून दिसून येते. त्याचप्रमाणे सुभेदार याने झाडगावचे खोतीचा सर्व कारभार रत्नागिरी येथील आपला मामलेदार यशवंतराव सबनीस याजकडे दिला. हे पाहून मिऱ्या, शिवरे व नाचणे येथील भाऊबंदानी सुभेदार याजकडे पुनः अर्ज करून झाडगावचे वतन आम्हा चारगावच्या भाऊबंदाचे समाईक आहे, असे दाखवून व आबाजीराव हा एकटाच त्याचा मालक नसून त्याचे दुसरे भाऊबंदही परागंदा आहेत, असे सांगून झाडगावचे वतन पुनः आपल्या ताब्यात घेतले. व आपल्या वतीने कृष्ण हरी फाटक याजकडे सोपविले. पुढे कृष्ण हरी फाटकाने मिऱ्या येथील सावंत साळुंख्यांना झाडगाव येथील परागंदा असलेले सावंत साळुंखे यांस त्यांच्या वतनावर आणविण्याची सल्ला दिली. त्यावेळी आबाजीरावाचा कनिष्ठ बंधू दाद सावंत बीन माल सावंत हा जयगड येथे होता, त्याला मिऱ्या येथील सावंत साळुंखे यानी फाटकाच्या सल्ल्याप्रमाणे झाडगाव येथे आणावयाचे, ठरविले परंतु आबाजीराव याजवर किल्ला फितूर केल्याच्या आरोपामुळे त्याच्या वंशजांना रत्नागिरी येथे येण्याचा मज्जाव होता, सबब मिऱ्या येथील सावंत साळुंखे यानी सुभेदार यास विनंति अर्ज केला की, आबाजीरावाने लबाडी केली, त्याचे प्रायश्चित त्यास मिळाले. त्यात त्याच्या दुसऱ्या भाऊबंदांचा काहीच दोष नाही. तरी त्यांना

आपल्या वतनावर येण्याचा हूकूम व्हावा, तेव्हा सुभेदाराने त्यांचे म्हणणे मान्य केले. अशा रीतीने सुभेदाराची परवानगी मिळवून मिऱ्या येथील सावंत साळुंखे ह्यांनी दादसावंत यास वतनावर आणून झाडगावचा सर्व कारभार त्याच्या स्वाधीन केला. शृंगारपूर येथून देसक याने आणिलेल्या पिलाजीराव साळुंख्यांचा अंत झाला होता व त्यांचे बंधू संभ सावंत व काय सावंत साळुंखे हे झाडगावचा कारभार चालविण्यास असमर्थ होऊन परागंदा झाले होते, ते पुनः परत झाडगाव येथे आले. त्यांना घालविण्याचा प्रयत्न दादसावंत यानी केला व आपले दुसरे हिसेदार नाग सावंत हेही तान सावंताच्या सामन्यानंतर पन्हाळा प्रांती परागंदा झाले होते. त्यांचे वंशज अंतोजी सावंत बीन दाद सावंत यासही आपल्या मदतीला आणिले; परंतु दाद सावंत यांचा इच्छित हेतू तडीस न जाता त्याना झाडगावच्या वतनातील अर्धा भाग मिळाला हे परिशिष्ट नं. १५ वरून वाचकांच्या नजरेस येईल

रत्नागिरी येथे अद्वितीय पराक्रम करून ज्या बंधूद्वयांनी आपली कीर्ति अजरामर केली, त्यांतील शेष राहिलेले तुकोजीराव साळुंखे यांचा चौथा पुत्र महाकाळ सावंत साळुंखे हा होता; त्याचे उदरी कूक सावंत साळुंखे, येस सावंत साळुंखे, गण सावंत साळुंखे व पील सावंत साळुंखे असे चार पुत्र होते. त्यांचेच वंशज हल्ली अनुक्रमे मिऱ्या, झाडगाव, शिवरे व नाचणे या चारगावी नांदत आहेत- वडील कूक सावंत साळुंखे याचा पुत्र गण सावंत साळुंखे यांस हर सावंत व माख सावंत साळुंखे असे दोन पुत्र होते, पैकी कनिष्ठ माख सावंत साळुंखे यांस संतती नाही. पुढे परिशिष्ठ नं ४ मध्ये "माख सावंत साळुंखे यांस मुले जहाली" असे म्हटले आहे; परंतु मूळ वंशावळीत त्याचा कोठेच उल्लेख नाही. झाली असल्यास ती अल्पवयीच निवर्तली असावीत. वडील हर सावंत यानी रत्नागिरी नजिक शिरगाव येथील तात्कालीन जहागिरदार नाईक तहसीलदार पवार याच्या मुलीबरोबर विवाह केला. तेव्हा त्या पवाराने मिऱ्या गाव मुलीला आंदण दिला. या पवाराला पुत्र संतती नव्हती. वृद्धापकाळी तो काशीला जावयास निघाला, तेव्हा त्याने आपले जामात हर सावंत यांजपाशी आपल्याबरोबर न्यावयास एक मुलगा मागितला. त्यावेळी हर सावंत यांना दोन पुत्र होते; परंतु त्यांनी आपले सासरे पवार यास मुलगा द्यावयाचे नाकारीले, म्हणून त्यानी आपल्या उपाद्धेबुवांचा मुलगा बरोबर नेला. पुढे पवार हे तिकडेच परलोकवासी झाले. त्यानी अंतसमयी त्या उपाध्ये बुवांच्या

मुलासच मृत्यूपत्र करून दिले. त्यांत "माझ्या सर्व जिनगीचे व मालमत्तेचे तुम्ही वारस होऊन माझ्या मुलीच्या वंशजांचा मान राखावा." असे लिहिले आहे. या पवाराच्या वैभवाची आज साक्ष म्हणजे त्याच्या वाड्याचा पडका चौथरा व त्याच्या स्त्रीचे मोडकळीस आलेले स्मारक ही होय. त्याच्या स्त्रीच्या स्मारकाला नायकीणीचे ठिकाण असे म्हणतात; ह्याचे कारण त्या पवाराला नायक तहसीलदार ही पदवी होती म्हणून, नायक या शब्दावरून नायकीणीचे ठिकाण म्हणण्याची पद्धत पडली असावी. या ठिकाणावरून शिरगावातील कोणतेही वाद्य वाजत जात असता बंद केले जाते; परंतु मिऱ्या येथील सावंत साळुंखे यांचे वाद्य वरील ठिकाणावरून वाजत जाण्याची मोकळीक आहे. या जहागिरदार पवाराच्या पूर्व इतिहासाचा आज थांग लागू शकत नाही, याचे कारण त्याचेही सर्व कागद पत्र उपाध्येबुवांच्या दप्तरी विसर्जन पावले. रत्नागिरी येथील सावंत साळुंखे यांची शिवछत्रपतीच्या स्वराज्य स्थापनेच्या वेळी महाराजाना मदत झालेली दिसून येत नाही, ह्याचे कारण ते विजापूर दरबारचे मिंधे होते हेच होय. मात्र महाराजांच्या ताब्यात कोकणप्रांत आल्यानंतर ह्या कुळातील काही माणसे महाराजांच्या फौजेत आढळून येतात. मिऱ्या येथील बळवंत सावंत बीन सूर सावंत साळुंखे हे एका तुकडीचे नायक असून ते शृंगारपूरनजिक एका लढाईत कामी आले. त्यांचे शव रत्नागिरी येथे मेण्यात घालून आणिले, तेव्हां त्यांची स्त्री दिपाबाई ही सती गेली. त्याप्रमाणे पुतळाजी बावाजो सावंत साळुंखे हे साताराच्या गादीचे शेवटचे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या पदरी फौजेत बऱ्याच मोठ्या हुद्यावर अंमलदार होते. प्रतापसिह महाराजाना कैद करून नेले तेव्हा त्यांनाही त्यांच्या बरोबर नेले, ते पुनः परत रत्नागिरी येथे आले नाहीत. झाडगाव पैकी नाग सावंत, अंत सावंत व भोळ सावंत हे परागंदा झाल्यावर महाराजांच्याच फौजेत नोकर होते, हे मागे आलेच आहे.

देवस्थाने

या सावंत साळुंखे घराण्याची त्यानी स्थापन केलेली मुख्य देवस्थाने तीन आहेत. त्यांची नावे श्रीदेवभैरी, श्रीजोगेश्वरी व श्रीनवलादेवी पैकी श्रीदेवभैरी ह्या स्थानासंबंधाने दोन शब्द लिहिणे आवश्यक आहे. हे स्थान रत्नागिरी किल्ल्यापासून सुमारे एक मैल लांब आहे व ते गंभीर आहे. या देवालयात मुख्यत्वेकरुन तीन देवता आढळतात. त्यात

त्रिंबकेश्वर व जंबुकेश्वर या दोन शंकराच्या आणि तिसरी श्रीदेवभैरी याची, पैकी शंकराची स्थाने फार जुनी आहेत असे वाटते व ते संयुक्तिकही दिसते. कारण चालुक्यांचे साम्राज्य ज्यावेळी दक्षिणेत चोहोकडे पसरले होते, त्यावेळी वरील शंकराच्या स्थानाची स्थापना झाली असावी, कारण चालुक्यांचे मुख्य दैवत शंकर हे आहे. दुसरी गोष्ट ही की, या देवळाच्या बाहेरच्या बाजूला बुद्धकालीन अकरा मूर्ती ठेविल्या आहेत; ह्यावरून चालुक्यानी शंकराची स्थापना करण्याच्या पूर्वी तेथे बुद्धांचे देवालय असले पाहिजे. तेव्हा शंकराची स्थापना करते वेळी त्या बुद्धकालीन मूर्ती बाहेर काढून ठेविल्या असाव्यात; नंतर सावंत साळुंखे यांनी श्रीभैरीची स्थापना केली आहे. भैरीच्या शेजारी एक त्रीमुखी देवीची मूर्ती ठेविली आहे, ती रत्नागिरी येथे पुरातन वसत असलेल्या गावडे वगैरे कुणबी लोकांची असावी. व परिशिष्ठ नंबर १ मध्ये वानस कुलकर्णी यानी म्हटले आहे की, गावी भैरीचे देऊळ पूर्वीचेच होते. ते भैरीचे नसून वरील त्रीमुखी ग्रामदेवतेचेच असले पाहिजे. या सावंत साळुंखे घराण्याच्या देवस्थानाना सरकारातून सालीना १५७ रुपये मिळत असतात. हे परिशिष्ठ नंबर १२ वरून स्पष्ट होते. श्रीभैरीचा उत्सव हे सावंत साळुंखे फाल्गुन पौर्णिमेला करीत असतात. उत्सवाची सर्व कामे त्यांच्या हुकमतीने होत असतात. ही त्यांच्या पूर्वाधिकाराची साक्ष आहे. इतर सार्वजनिक देवाधर्माच्या कामातही ते पहिले मानकरी आहेत. रत्नागिरी किल्ल्याचे पायथ्यास मिरकरवाडा म्हणून एक मुसलमानांची बरीच मोठी वस्ती आहे. माघ महिन्यात त्यांच्या पिराची मोठी यात्रा भरत असते तेव्हा त्यांच्या पिरावर पहिले गलीफ (पिरावर चढविण्याचे वस्त्र) ह्या साळुंख्यांकडून चढविले जाते; म्हणून ते मुसलमान ते वस्त्र चढविण्याकरिता ह्यांना वाजत गाजत घेऊन जातात. फाल्गुन महिन्यात भैरी देवाची धुळवट वरील मिरकर वाड्यातून जात असते, तेव्हा हे सावंत साळुंखे त्यांच्याकडून पैसेही वसूल करितात. ब्राह्मण, वाणी वगैरे मंडळीत देवकार्य झाले असता पहिला मान या सावंत साळुंखे यांचा राखला जातो. तसेच वाणी उदमी लोकांकडून भैरीच्या देवळात एक वार्षिक किर्तन हक्काने करविले जाते. मिऱ्या व नाचणे गाव रत्नागिरीपासून सुमारे ४ मैलावर असल्यामुळे तेथील साळुंखे बंधूनी तिसरे देवस्थान नवलादेवीचे मंदीर आपआपल्या गावी बांधिले आहे. त्याचाही उत्सव ते फाल्गुन

पौर्णिमेलाच करितात. तेव्हा या दोन्ही गावच्या पालख्या मूळ देवस्थानांना भेटावयास रत्नागिरी येथे येतात. चौथा शिवरे गाव हा रत्नागिरी शहराला लागूनच असल्यामुळे त्यांना निराळे देवस्थान स्थापण्याचे कारण नाही, ते पुरातन देवस्थानातच भाग घेतात. मिऱ्या गावी भाऊबंदीत कलह होऊन जाकीमिऱ्या व सडा मिऱ्या असे दोन भाग होऊन देवस्थानेही निरनिराळी झाली आहेत. तेथील लोकानी म्हसेश्वर हे एक निराळेच देवस्थान स्थापिले आहे. या सावंत साळुंख्यांचे वानस व खंडकर महाजन हे कुलकर्णी असल्यामुळे देवाधर्माच्या कार्यात त्यांचा काही मर्यादेपर्यंत त्यांनी मान ठेविला आहे.

पडत्या काळात वतनाची दुर्दशा.

रामराव सुभेदाराने रत्नागिरी येथील सावंत साळुंखे यांची सत्ता संपुष्टात आणिल्यामुळे त्यांच्यावर अनेक संकटे कोसळली, हे मागील प्रकरणी आलेच आहे. आपले स्वत्त्व राखण्याकरिता सत्ताधारी सुभेदाराशी दोन हात करण्याची पाळी आल्यामुळे त्यांना देशांतरही करावे लागले. या त्यांच्या पडत्या काळाचा फायदा घेऊन त्यांनी संपादन केलेल्या रत्नागिरी येथील जहागिरीची दुर्दशा झाली, व त्यांतील बराचसा भाग तिसऱ्यांच्याच ताब्यात कसा गेला हे प्रस्तुत ग्रंथांतील ग्रंथीत केलेल्या कागदपत्रावरून वाचकांच्या ध्यानात येईल. संकट काळी ते परागंदा असता बनावट बक्षिस पत्रे करून त्यांच्या जहागिरीतील बराच अंश कसा गिळंकृत केला गेला, हे परिशिष्ठ नंबर २ वरून कळून येईल. फाटक व खंडकर महाजन हे वानसाप्रमाणे ह्या सावंत साळुंखे सरदाराचे कुलकर्ण व त्यांचा हुकूमाने त्यांच्या इस्टेटीचा कारभार करीत होते, असे परिशिष्ठ नंबर २ ते ६ वरून निर्विवाद सिद्ध होते. परिशिष्ठ नंबर ३ मध्ये फाटक याने मिऱ्या येथील सावंत साळुंखे यास स्पष्ट म्हटले आहे की "तुमचा हुकूम जहाला तर रामरावाजवळ विनंती करून कवूल काढून घेऊन येईन." या वरून सावंत साळुंखे यांचे व फाटक, खंडकर मंडळीचे धनी सेवकाचे नाते होते असे दिसून येते. तान सावंत बीन गण सावंत याने सुभेदाराविरुद्ध आरे मुकामी सामना दिला. त्यामुळे झाडगाव येथील साळुंखे परागंदा झाले, तेव्हा मिऱ्या येथील त्यांच्या भाऊबंदानी झाडगावचे वतन आपल्या ताब्यात घेऊन त्याचा कारभार कुलकर्णी या नात्याने खंडकर महाजन याजकडे चाल-

वावयास दिला. तो त्याने चार पांच वर्षे चालविला. पुढे शृंगारपुराहून पील सावंत हे आले, तेव्हा मिऱ्या येथील सावंत साळुंखे ह्यांनी झाडगावचा कारभार खंडकर याजकडून काढून वरील पील सावंत याजकडे दिला. त्यावेळी मिऱ्या येथील सावंत साळुंखे याजपाशी अंतभट खंडकर येऊन त्याने "हा सावंत कोण कोठील? आणि मी गाव चालवित होतो, हा नको म्हणून यासी चालवावयासी सांगितला", असे परिशिष्ट नंबर ५ मध्ये स्पष्ट म्हटले आहे.

यावरून खंडकर महाजन यांचे मन पील सावंत याजविषयी कलुषित झाले व तसे होणे स्वाभाविक होते; कारण पील सावंत याच्या शृंगारपूराहून झालेल्या आगमनामुळेच खंडकर याच्या हातून झाडगावचा कारभार दूर झाला. तेव्हा त्याची कुलकर्णी या नात्याने पील सावंत यास व्हावी तशी मदत झाली नाही. आता देसक यांचे पाठबळ पील सावंत यास असल्यामुळे अधिकारभयास्तव खंडकर याने पील सावंत यास वरवर सहाय्य केल्याचे दिसून येते; परंतु ते मनापासून नव्हते. तेव्हा अशा परिस्थितीत पील सावंत हे वसूल वगैरे गोष्टीच्या अभावी लवकरच मेटाकुटीस येऊन कारभार चालविण्यास असमर्थ झाले आणि झाडगाव वतनातील बराच भाग खंडकर महाजन यांच्या पदरी गहाण खरेदी रूपाने पडला. अशा रीतीने खंडकर महाजन हे जमीनदार झालेले दिसून येतात. अशाच अडचणीच्या काळात फाटक हे मिऱ्या येथील सावत साळुंखे यांच्या रहाटागर वतनाचे जमीनदार झाले असावेत. एरवी दुसरे काहीच कारण कागदोपत्री आढळून येत नाही. रत्नागिरी येथील पेठ शिवापूर याच सावंत साळुंख्यांनी वाणी उदमी लोकांच्या हस्ते बसविली आहे, हे परिशिष्ठ नंबर ११ वरून दिसून येते. भंडारी ज्ञातीला वसाहतीकरिता ह्या सावंत साळुंख्यानी आपल्या जहागिरीतून जमीनी वतन करून दिल्या आहेत, हे परिशिष्ठ नं. ७ ते १० वरून आढळून येईल परंतु त्यांच्याकडून वसूल योग्यवेळी न मिळाल्यामुळे काही काळाने या सावंत साळुंख्यांचे खोती गाव खालसा झाले.

रत्नागिरी येथील साळुंखे ह्यांची सांप्रतची परिस्थिती

आतापर्यंत झालेल्या विवेचनावरून झाडगावकर बंधूंचा बराच काळ संकटाना तोंड देताना गेला. आणि त्यांनी न डगमगतां सत्ताधारी सुभेदाराशी आपले स्वत्व राखण्याकरिता अखेरपर्यंत धडपड केलेली दिसून येते. आपली सत्ता नामशेष करणाऱ्या सुभेदाराला

उलथून पाडण्याचे भागिरथ प्रयत्न त्यांच्याकडून झाले, इतकचे नव्हे तर वेळी आपले प्राणही खर्ची घालावयास त्यानी मागेपुढे पाहिले नाही. दुर्दैवाने हे त्यांचे प्रयत्न फसते ना तर आज साळुंखे वंशाला भारतीय इतिहासात योग्य स्थान मिळाले असते. आता रत्नागिरी येथे आलेल्या तुकोजीरावाचे वंशज आज मिऱ्या, शिवरे, नाचणे व झाडगाव ह्या चार गावी नांदत आहेत, हे पूर्वी सांगितलेच आहे. हे चारही गाव रत्नागिरी तालुक्यात असून, रत्नागिरी शहराला लागून आहेत. किंबहुना पूर्वी आलेले झाडगाव व रहाटागर म्हणजेच रत्नागिरी. या चार गावी वसत असलेल्या साळुंखे वंशजांचा हल्लीचा धंदा म्हणजे शेती व हिंदुस्थान सरकारची नोकरी हा होय. झाडगाव व मिऱ्या येथील साळुंखे वंशजाच्या वतनाचा बराच भाग कारकुनांच्या पदरी पडला आहे. नाचणे गावची इस्टेट मात्र कायम आहे. व तेथील जमेदार रा. बापू जिवाजीराव सावंत साळुंखे ह्यांचे सुमारे पाच सहा हजाराचे उत्पन्न आहे. नोकर पेशात बरेच लोक आहेत. त्यातले त्यात पोलीस खात्यात विशेष समूह आहे. शिपायगिरीपासून सबइन्स्पेक्टर व इन्स्पेक्टरच्या दर्जापर्यंत पोहचलेली साठ सत्तर माणसे आहेत. शिक्षणाच्या बाबतीतही ह्या कुळातील लोकानी रत्नागिरी जिल्ह्यातील मराठा मंडळात बरीच आघाडी मारली आहे. सांप्रत या कुळात पाच ग्रॅज्यूएट आहेत, आणि बी. ए. च्या वर्गात शिकणारे तीन चार विद्यार्थी आहेत, त्याचा तपशील देणे जरूर आहे. रा. रा. जीवनराव राघोजीराव सावंत साळुंखे हे बी. ए. असून आय. सी. एस. च्या परिक्षेस इंग्लंड येथे गेले होते, परंतु दुर्दैवाने त्याना त्यात यश मिळाले नाही. आय. सी. एस. ला जाणारे हे पहिलेच मराठा गृहस्थ आहेत. हे रेव्हीन्यूमध्ये हुजूर डेप्युटी कलेक्टर होते; ते सांप्रत पेन्शनर आहेत. रा. रा. रघुनाथ हरी सावंत हे बी. ए. असून मुंबईमध्ये चांगल्या हुद्यावर आहेत. रा. रा. वामन सितारामराव सावंत हे बी. ए. एल. एल. बी. असून जळगाव येथे वकीली करीत आहेत. रा. रा. परशराम कृष्णराव सावंत हे बी. ए. असून सध्या एम्. ए. एल. एल. बी. चा अभ्यास करीत आहेत. रा. रा. सदाशिव यशवंत सावंत हे बी. ए. जी. असून रेव्हीन्यू खात्यात नोकर आहेत. रा. रा. शंकर बाबाजी सावंत हे बी ए. चा अभ्यास करीत आहेत. रा. रा. रंगराव जीवाजीराव सावंत हे विलायतेस बार-ॲट-लॉचा अभ्यास करीत आहेत. रा. रा. शांताराम गणपत सावंत हे सिनियर बी. ए. च्या वर्गात आहेत.

मॅट्रीक्युलेशन झालेली व तेथपर्यंत पोहचलेली अशी साठ सत्तर माणसे आहेत. सारांश निरक्षर स्थितीत शेकडा दोन तीन माणसे आढळतील. विसाव्या शतकापासून पोलीस खात्यापेक्षा कारकूनी पेशात विशेष लोक दिसून येतात. डॉ. बाळकृष्ण नारायण सावंत हे एल. सी. पी. एस. असून रत्नागिरी येथे त्यांचा स्वतंत्र दवाखाना आहे, व ते रत्नागिरी म्यु. पा. मध्ये सभासदही आहेत. रा. रा. तुकाराम देवजीराव सावंत हे उत्तम चित्रकार असून त्यांच्या चित्राची छायाचित्रेही वर्तमानपत्रात अनेक वेळा प्रसिद्ध झालेली आहेत. मिऱ्या येथील सावंत साळुंखे बंधूंनी मुंबई येथे एक " मिऱ्या मराठा शिक्षण फंड " ह्या नावाची गरीब व होतकरू मराठा विद्यार्थ्यांना मदत करणारी संस्था इ. स. १९१४ मध्ये स्थापन केली आहे. त्या संस्थेमधून गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या दिल्या जातात.

परिशिष्ठ नं. १

मुकदमा नं. ३८४ सन १८२५

यादी ठराव मौजे झाडगाव कर्यात नेवरे येथे बाळाजी गंगाधर वानस कुळकर्णी राहातात. त्या ठिकाणाविसी शंकर सावंत बीन तान सावंत साळुंखे वगैरे समस्त मिरकर सावंत खोत मौजे मजकूर वं वाडा मिऱ्या यांचा व कुळकर्णी याचा खटला आहे. सबब प्रस्थली पंचाईत राजेश्री रावजी देशमुख सुभेदार तालुके रत्नागिरी यानी तालुके अंजनवेल येथील मामलेदारास पत्र देऊन तर्फ सावर्डे तालुके मजकूर येथील देशमुख, देशपांडे यांचे नावे पत्र जमेदार खोत यांस आले त्याजविसी अंजनवेलचे मामलेदार यांजकडून नावनिशीवार पुरवण्या जमेदार यास आल्या. त्याजवरून, मौजे मांडकी तर्फ सावर्डे येथील अन्नछत्राचे मुक्कामी सर्व जमेदार व अर्ज, विचार सभ्य गृहस्थ व सावंत खोत यानी व वानस यानी जमा करून व देशमुख याजकडे करिने, कतबे मान्यता व वर्तणूकीस जामीन त्यांची पत्रे व जबान्या व फेरीस्त वगैरे कागद लखोटा करून सुभाहून आणिला होता, तो पंचाईताजवळ देऊन पंचाईत मनास आणून, सांगतील त्यास मान्य म्हणोन उभयतांनी मान्य पत्रे लिहून दिली. त्याजवरुन सर्वांचे विचारे चौकशी करण्याची तशी करून, उभयतास

पुर्सीसा घातल्या. पुर्सीसांची उत्तरे वानस कुळकर्णी यांनी व मिरकर सावंत खोत यानी दिली, त्यातील सारांश पहाता, वानस म्हणतात की, ज्या दिवशी आपले वडील मौजे झाडगाव येथे सावंताबरोबर आले, ते धामधूमीच्या बंदोबस्तास विजापूराहून आले. ते चौकी ठिकाण आहे, त्या ठिकाणावर आले. तेथे सावंत सरदार व आपला वडील कारकून सबनिस, सबब एकच जागी राहून धामधूमीचा बंदोबस्त केला. नंतर घर बांधून राहिले. तेव्हा आपले वडील यांने घर हाली आपण नांदतो याच ठिकाणांवर घर बांधून राहिले. त्या दिवसापासून हे दिवसपर्यंत आपली वसाहत याच ठिकाणावर होत आली. अलिकडे दुसरे ठिकाणी आपला वडील आपणा पावेतो नांदला नाही. व या ठिकाणी आपले पूर्वी सावंत खोत यांची नांदणूक नाही. त्याजवरून पुशीले की, श्रीदेव भैरीचा पालखीचा मान, खोतापूर्वी तुम्हाकडे यावयाचे कारण काय? व हा मान कोणाचा? त्याजवरून कुळकर्णी याने लिहून दिले की, आपले देवस्तीपूर्वी पालखीचा मान या ठिकाणावर येत होता. परंतु मान कोणाचा व ठिकाण कोणाचे हे आपणास ठाऊक नाही. ज्या वेळेस हे ठिकाण आपणास साध्य जहाले, त्या दिवसापासून मान पालखीचा, या ठिकाणाचा सबब आम्हाकडे येत आला; तो मानही साध्य जहाला. हल्ली सावंत या मानाकरिता व ठिकाणाकरिता नवीन खटला करितात. या प्रमाणे वानस कुळकर्णी यानी लिहून दिले. सावंत, मिरकर, खोत, झाडगाव यांनी लिहून दिले की, पूर्वी आपला वडील मुळपुरुष गावी आला तो चौकीच्या ठिकाणात काही दिवस राहिला पुढे वतन साध्य केले. अवलादही जहाली. त्यावेळी एक भाऊ व आपण मौजे मजकूरी राहिलो, व एक मौजे शिवरे येथे गेला, व एक मौजे नाचणे येथे गेला, याप्रमाणे जिकडील तिकडे गेले. तेव्हापासून आपले वडील या ठिकाणावर नांदले. नंतर मौजे मजकुरचे दोन गाव जहाले मौजे झाडगाव मौजे रहाटागर ऐसी नावे पडली. सबब वानस कारकुन आपला याजकरिता त्यास कुळकर्णी काम सांगोन, घर व ठिकाण वानस याच्या स्वाधीन आपले म्हणोन सागोन, आपण रहाटागर येथे + घर बांधोन नांदावयास गेले; पुढे मिऱ्या वाडा आंदणी आपला याजकरिता काही दिवस तेथे गेले. त्या दिवसा-

+ या घराचा चौथरा बाबासाहेब परकर यांच्या वाड्यानजीक तेल-बटरात आहे

पासून आज पावेतो आपण मिन्यास नांदलो. मौजे मजकूरचे ठिकाण व कुलकर्ण व पालखीचा मान वानस याजकडे त्याचे स्वाधीन केल्यापासून आपला म्हणोन चालत आला. हाली आपण त्या ठिकाणावर येऊन नवे घर बांधो लागलो, त्यास मुहूर्तानें दगड पुरून शेरणीसुद्धा वानस कुलकर्णी यास दिली. पुढे चौथरा बांधो लागलो तो वानस अडथळा करू लागले व आम्हास सरकारात बलावणे करवून पाठीमागे त्या मुहूर्ताची जागा दगड पुरीला होता त्याजवर गुराचा वाडा जोते चीरेबंदी घालून बांधिला; तेव्हा आपले वडिलाने त्याचे स्वाधीन घर व कुलकर्ण केले आणि आपला मानपानही आज पावेतो त्याच ठिकाणात घरात घेण्यात आले, असे असून आमची जागा आम्हास नव्हे म्हणतो, आणि वाद सांगतो. याची मनसुबी सुभाहून प्रस्थली तुम्हाकडे आली, त्यास तुम्ही पाच पंचाईत सांगाल त्यास आपण राजी असो, म्हणोन लिहोन दिले आणि कुळकर्णी यांनीही लिहोन दिले. त्याजवर पुर्सीसा घालून त्यातील सारांश पहाता, कुलकर्णी यांच्याच लिहिण्यात पूर्वापार मान ठिकाणाचा अद्यापपर्यंत याच घरात घेत आलो. त्यास खोतापूर्वी मान कुलकर्णी याजकडे जातो; आणि कुलकर्णी सावंताचा सबनीस पुढे सावंतानीच कुलकर्ण दिले म्हणतात, त्याजवरून पहाता घर, ठिकाण, मान सुद्धा सावंतांचा असे ठरते ; व कुलकर्णी यांचे पूर्वीचे ठिकाण आपल्या वडिलांनी दिले ते खोराणात * आहे, म्हणोन सावंत लिहून देतात. व कुलकर्णी यानीही खोराणाचे ठिकाणावर हाल्ली घर, विहीर बांधली आहे म्हणतात. व काही त्या ठिकाणापैकी जमीन भूमीदान पाटणकर उपाध्ये यास दिली म्हणतात, आणि लिहोनही दिले. त्यावरून जागा, ठिकाण, घर, मान, पान, सावंतांचा कुलकर्णीही लिहोन देतात. की, जेथून मान तेथून प्रथम सावंत खोत यांचा, व दुसरा खंडकर महाजन ह्यांचा व तिसरा आमचा कुलकर्णी यांचा, व दोघापूर्वी आमचा मान नाही. आणि प्रथम पालखीचा मान आपल्या घरी घेतात तेव्हां मान ठिकाण सावंत खोत यांचे असे दिसोन आले. परंतु ठिकाणात वास्तव्य भोग्य बहुत दिवस कुलकर्णी यांचे जहाले. आणि ठिकाण, घर व मान सांभाळून राहिले. त्याजवरून कुलकर्णी यांस घालवून घर ठिकाण सावंतांचे हवाली करावे. हे चौघांच्या विचारास येत नाही.

* खोराण हे ठिकाण पर्टवण्यावर आहे.

याजवरून मिरकरकर सावंत खोत यानी त्या ठिकाणात एक घर बांधोन राहोन, आपला मान पान घेऊन असावे व कुलकर्णी यांनी हाली घर आहे, या घरात राहोन कुलकर्ण चालवून असावे, याप्रमाणे चालावे. कुलकर्णाचा तिसरा मान येईल तसा घ्यावा. सदरहू मजकूर पंचाईत मते आला, परंतु वादी याची कल्पना की उभयतानी टेपीस उतरावे. त्यावरून टेप सावंत खोत ह्यांचे म्हणणे ठिकाणात आपले वडील व कुलकर्णी याचे वडील गावी आले त्या पूर्वीच ठिकाणावर भैरीच्या पालखीचा मान येत होता, तोच आज पावेतो आम्हाकडे चालत होता, असे बाळाजी गंगाधर कुलकर्णी वानस म्हणतात. त्याजवरून सावंत मिरकर खोत झाडगाव यांचे म्हणणे की, आम्ही टेप देतो ; पूर्वी आपले देवस्ती अगोदर गावी भैरीचे देऊळच नव्हते. भैरी देवाची स्थापना सावंतानी केली, तो आमचा कुलस्वामी. याप्रमाणे पुरवणी, चार गावचे सावंत आपले भाऊबंद व मौजे मजकूरचे वतनदार खुम यांचे मुखे पुरवून देऊ व कुळकर्णी याचे म्हणणे की, श्री भैरीचे देऊळ पूर्वी पार गावी आहे व वस्तीही गावी होती; याप्रमाणे पुरवणी करून देवून देऊ. तरी वादास खोट याप्रमाणे बोलतात. परंतु बहुत दिवशी जाबसाल मान्य. टेप घ्यावी असा संभव होत नाही. जहाला मजकूर शेवेशी लिहून पाठविला आहे. मिती माघ व।। १० शके १७३५ श्रीमुख नाम संवत्सरे सुमाई असेत मया तेन आलफ.

यासी पंच.

१ आवाजी अनंत वहालकर सर खोत मु।। ता।। सावर्डे.
२ सदाशिव अनंत काटदरे खोत मौजे मुर्तवडे तो वेलंब.
३ हवाजी नानल.
४ पांडुरंग भाटे मौजे दुरवाडी तो।। चिपळूण.
५ सदाशिव गोपाळ भाटे।। मु।। निवळी.
६ मोरोबा दाभोळकर मौजे मांडकी ता।। सावर्डे.
७ मोरो कृष्ण हर्षे खोत मौजे मांडकी ता।। सावर्डे.
८ सदाशिव धोंडदेव जोशी मौज कासे.
९ नारायणराव बीन चांदजीराव चव्हाण कोकणराव देशमुख मामले ×हमजाबाद खोत मौजे येगाव ता।। सावर्डे.
१० धाकोजीराव चव्हाण कोकण राव देसाई मामले हमजावाद.

× दाभोळ खाडी पलिकडील प्रदेश.

११ पर्वतराव रायानराव प्रतापराव सर वतनदार मौजे कोकरे ता।। सावर्डे तो अंजनवेल.

१२ रत्नोजीराव सुर्वे खोत मौ।। निवळी पालवण ता।। सावर्डे तो अंजनवेल.

१३ बाबूराव घाग हडकणकर खोत पाटील मोकाशी मौजे पाली ता।। याबी सुभा व्याघ्रगड.

१४ चंदरराव शिर्के खोत मौजे कुडप ता।। सावर्डे.

१५ शंकरराव गुजर खोत मौजे आमतखोल ता।। सावर्डे तो अंजनवेल.

१६ अण्णाजी घाग खोत मौजे नायसी ता।। सावर्डे तो अंजनवेल

१७ अमृतजी घाग ,, ,,

१८ वाघोजी नाईक पंडीत मौजे दुरवाडी तो चिपळूण

१९ गणोजी नाईक पंडीत ,, ,,

२० अमृतराव घाग खोत मौजे धैवली तो वेलंब.

२१ हस्ता अखीर बाबूराव घाग खोत हडकणकर.

बी कलम कृष्णाजीराव दळवी. रायानराव प्रतापराव सर वतनदार जाडी पालवणकर मौजे कोकरे ता।। सावर्डे तो अंजनवेल सुभा दाभोळ प्रांत प्रभानवली मामले हमजाबाद.

परिशिष्ठ नं. २

साळुंखे ऊर्फ पाटणकर घराण्याचे कैफयतिमध्ये बाळाजी बाजीराव पेशवे यांच्या रोजनिशीतील पत्र नं. ९६ पृष्ठ ६३ मध्ये बाळाजी खंडो वानस याने बाळकृष्ण केशव वर्तक याजविरुद्ध बनावट दस्ताऐवज केल्याबद्दल फिर्याद केलेली असून, मौजे मजकूर देखील वाडे याचे कुलकर्ण व पेठ मजकूरचे मिठबंदरचे पथिकपण आपले प्रपितामह सुंदो खंडकर यास सावंतानी दिले आहे. म्हणून फिर्याद करून आपले नावे निवाडापत्र करून घेतले आहे.

प. नं. १ मधील ठरावाच्या यादीची नवकल रत्नागिरी डी. कोर्टातून घेतली आहे.

।। श्री ।।

परिशिष्ठ नं. ३

×यादी जवानी बाल सावंत बीन गण सावंत मौजे झाडगाव कर्यात नेवरे सुमाई सन सबान मया व आलफ + कारणे साहेबाचे सेवेसी लिहोन दिल्हा करीना ऐसा जे. मौजे मजकूर येथील खोतीविसी आपला व दाद सावंत बीन माल सावंत याचा कज्या लागोन, मनसुबी सुभा जंजिरे रत्नागिरी येथील मुक्कामी पडोन, हर दुजणांनी कतबे लिहोन दिले. जामीन व करिना लिहोन देणे म्हणोन आज्ञा. ऐशास तलकोकण सुभा राजापुर येथील दर्या किनारा मलेबारी व दिगर चोरठे येऊन गाव गना आरमार लावून चोरी करीत. त्याचे रखवालीबद्दल विज्यापुराहून बादशाही यानी मुकासी* रवाना केले. तेसमयी मौजे मजकूर येथील रखवालीबद्दल *तान सावंत व हीर सावंत यांचे वडील व आपले वडील हे दोघे सखे भाऊ विजापुरी चाकर होते त्याजला पाठविले. ते मौजे मजकुरी उचवडा जागा मध्यभागी दोन्ही बंदरे गावची दिसत ऐसा जागा पाहोन, त्याजवर अलंग बांधोन राहिले. तिचे नाव चौकी असे प्रसिद्ध आहे. चौकीवरून गावची रखवाली करीत, आणि गाव पाहत. ऐवज संरमजामास चौकीच्या लोकास व आपणास दिला होता तो घेत असत. पुढे चोरठे यांचा बंदोबस्त जहाला. उपरांतिक आपले व तान सावंत, हीर सावंत यांचे वडिलानी गावात ठिकाणे जमाविली. घरे बांधोन राहिले त्यांचे नाव दाहीजे ऐसे म्हणतात. त्यापासून गावची देव देवस्की व कारभार व मान पान आम्ही करू सावंत करू लागलो, तेव्हापासून आमच्या वडिलास मिरासी म्हणो लागले. त्याजवर तान सावंत हीर सावंत हे महाली हकिमासी व देशकासी सुरलीतपणे न वर्तत. पुंडावे करीत. महालो न भेटत. रोखा पत्र आला तरी न मानीत यामुळे कटाक्ष वाढोन दप्तरे कज्या जहाला. तेव्हा आरे मौजे××पुसाले येथे तान सावंत पुंडावे करावयासी गेला होता. तो खाजणात दबा धरुन राहिला होता. तेथे स्वारी महालची जात होती. त्यांची गाठ पडली. त्यांनी या खाजणा-

×हीं जबानी रा रा. सिताराम काशीराव सावंत साळुंखे यांजकडे उपलब्ध झाली आहे.

+ इ. स. १७५१. * पृष्ठ १४ वरील टीप पहा.

*यावरून महाकाळ सावंत व प्रतापराव सावंत हे सखे भाऊ हे सिद्ध होते.

× ×आरे व नेवरे यामधील प्रदेश.

मध्ये तान सावंतास ठार मारिला. हीर सावंत गावी होता तो तान सावंत याजला मारिला, त्याची दहशतीमुळे परागंदा होऊन गेला. तान × सावंत हीर सावंत हे सखे चुलत भाऊ ऐसी वदंता आहे. आपला आजा संभ + सावंत त्याचे भाऊ पील सावंत व काय सावंत गावी होते. पील सावंत कर्ते. हे श्रीगारपुरकर राज्यासी चाकर होते. आमचे आजे गावी होते त्यांचे वस्तु गावचे कारभाराचे ओझे न चालवे. तान सावंत मारीला, हीर सावंत परागंदा जाहला सबब गांवची वस्ती न 'होय म्हणोन देशक यानी माहाली हकिमापाशी अर्ज करून * पील सावंत राज्यापाशी होते, त्यास पत्र पाठवून आणून गाव त्याचे स्वाधीन केला. त्या दिवसापासून ××साठ पासष्ट वर्षे खोती त्याने केली. ते समयी दर्यातून आरमारी चोरटे बंदरा नजीक घरे असत त्यास उपद्रव करीत; याजकरिता कुलकर्णी फुगरवटारात राहिला होता. पील सावंत आले, त्याजला गांवचा कारभार महाजन व कुलकर्णी मिलोन करावा लागतो म्हणोन *खंडकर माहाजन याजपाशी जागा मागोन घर बांधोन राहिले. वाडा

×हीर सावंत हा मिन्यापैकी असून तान सावंत याचा चुलत पुतण्या होतो. हे दोघे समकालिन कारभार पहात होते.

+ पील सावंत यांचे भाऊ संभ सावंत व काय सावंत हे त्यांच्या बरोबरच शृंगारपुराहून आले. त्यांच्या पूर्वी ते झाडगावात नव्हते, असते तर मिन्या येथील सावंतांनी झाडगावचा कारभार खंडकराचे स्वाधीन करण्याचे कारण नव्हते.

*मिन्या येथील भाऊबंद झाडगाव येथील वतनाची व्यवस्था पहात असता देसक याने शृंगारपूर येथून पील सावंत यांस आणण्याचा उपद्व्याप करण्याचे कारण काय असावे याचा विचार करिता हेच म्हणणे भाग पडते क', देसक याचा झाडगाव येथील वतनावर हात टाकण्याचा विचार असावा. कारण दसक याचे हे हातकबे व खेडशी हे झाडगाव वतनानजीक आहेत. तेव्हा पील सावंत हा आपल्या वतीचा माणूस झाडगावच्या वतनावर आणीला म्हणजे आपला डाव साधेल अशी त्याची कल्पना असावी.

××प. नं. ५ मध्ये ५० वर्षे खोती चालविली असे म्हटले आहे. व येथे साठ पासष्ठ वर्षांचा उल्लेख केला आहे, हे म्हणणे विश्वसनीय वाटत नाही. पील सावंत हे लवकरच कारभार चालविण्यास असमर्थ झाले हे पुढे त्याच जबानीत म्हटले आहे.

*रत्नागिरी येथील सावंत साळुंखे परागंदा झाल्यावर तेथील कारभार मिन्या येथील सावंतानी खंडकर याजकडे मुखत्यार या नात्याने चालवावयास दिला होता हे प. नं. ४ वरून दिसून येते; तेव्हा वरील जबानीत नमूद केलेली जमीन खंडकर याजकडून दिली गेली असल्यास ती मिन्या येथील सावंत यांच्याच परवानगीने दिली हे निर्विवाद आहे.

खडपे येथे शेत पाच बिघे होते. यास्तव आंबेबन नवसाधन जागा मेलवून गुरे बैल माणसे शेताची राबवावयासी घर लहानसे बांधिले होते. पुढे रत्नागिरी किल्ला संभाजी महाराज यांनी बांधिला. त्यापासून चोरटे याचा उपद्रव करी तो दूर जाहालया उपरांतिक गावात येऊन पहिल्या ठिकाणी राहिले. खोतीमुळे कर्जदार जहाले, तेव्हा कानोजी आंग्रेसरखेल यांनी जयगड किल्ला वर्सावला त्याजकडे गेले. मागे अंबा सावंत, दाद सावंत याचा भाऊ वडील याने रामराव याजपाशी तान सावंताचा वंशज म्हणोन खोती चालविली. त्याजवरी जैगडास पळोन जाऊन सरखेल याजकड रत्नागिरी किल्याचे राजकारण केले. याजमुळे त्यांजकडे आरोप आला. आरोपामुळे धरून आणून रामराव यांनी मारून टाकिला. आरोपा सबब गावची खोती सरकारातून ×कृष्णा हरी फाटक यासी सांगितली. त्याजवरी कृष्णा हरी खोती चालवी.

पुढे दोहोतीही वर्षी रायापासी अर्ज करून आबा सावंत याचा *वडिल भाऊ दाद सावंत जैगडी होता, त्यास कौल पाठऊन गावी आणून गावची खोती कृष्णा हरी याने अर्ज करून स्वाधीन केली. आपले आजे पील सावंत जैगडास गाव टाकून गेले होते ते गावी आले. वृद्ध कर्जाने फार गांजले होते. शेते लोकाकडे गहाण ठेविली. खोती करावयासी सामर्थ्य नाही. आणि त्याचा काल जहाला. आपला बाप गण सावंत हे गावीच होते, ते पोटाचे व देणे करी याचे तगाद्यामुळे व कुणबाव भारी यामुळे हैरान गतीच होते. दाद सावंत खोती चालवित परंतु मान पान नीमे नीमे प्रमाणे आम्ही व दाद सावंत घेत आहो. राजश्री तुळाजी आंग्रे सरखेल यांचे कारकिर्दीत पाच वर्षे आपण 'खुद्द खोती केली. पुढे वर्सलीन करावी याप्रमाणे करार होऊन दाद सावंत याने खोती केली. त्यास पाच साल चालविल्यानंतर आपण खोतीची वर्सल करावयासी लागलो तो दाद सावत म्हणो लागला की, शेते तुजकडे अधिक आहेत, त्याचा

× झाडगावचे वतन सरकारात जप्त केल्यानंतर ते मिन्या येथील सावंतांनी रामराव सुभेदारकडून आपल्या ताब्यात घेतले. व नंतर आपल्या वतीने कृष्णा हरी फाटकाकडे चालवावयास दिले रामराव याने कृष्णा हरी फाटक यास दिले नाही. प. नं. ४ पहा.

*प्रस्तुत जबानीत वर आबा सावंत हा दाद सावंत याचा वडील भाऊ असे म्हटले आहे व तेच खरे आहे. आणि येथे दाद सावंत हा आबा सावंत याचा वडील भाऊ असे म्हटले आहे. यावरून झाडगावचे सावंत साळुंखे यांच्या वंशातील पुरुषांसबंधाने बाल सावंत बीन गण सावंत याना असावी तेवढी माहिती नव्हती हे उघड आहे.

विभाग निमेप्रमाणे मजला देणे आणि खोती करणे. त्याजवर आपण बोलीले की तान सावंत व हीर सावंत याचे व आमचे वडिलांचे पूर्वीचे शेताभाताचे वाटे जहाले आहेत. अलीकडे मेलविले अथवा हारविले ते ज्याचे त्याचे आपले शेताभाताचा वाटा देणार नाही; त्याजवरी राजेश्री कृष्णाजी पंत सुभेदार याजपाशी आपण विनंती करून सदरहू खोतीचे वर्तमान निवेदन केले. त्याजवरून त्यांनी खोती माझी माझे स्वाधीन केली; ते एकसाल खोती केली. त्यामुळे बाबुराव शंकर दिवाणगिरी करीत होते. त्याचे भावजयीचा पाय कुजला तो बरा न होय म्हणोन मागती दादसावंत यास खोती चालवावयासी सांगितली. त्यापासून आमचा व त्याचा खोतीवीसी कज्या लागला आहे. याजकरिता राजेश्री रामचंद्रपंत पावसेचे मुक्कामी साहबी देत आले होते; तेव्हा ×हीर सावंत त्याजपाशी फिर्याद जहाला की *गुणसावंत आपणापाशी खोतीविसी कज्या सांगतो तरी शेते गुणसावंत याजकडे जास्ती आहेत, याचा वाटा निमे निमेप्रमाणे करून देववावा, म्हणजे निमे निमेप्रमाणे त्याने व आम्ही खोती करावी. त्याप्रमाणे करार केला; परंतु आपण त्या शेताच्या करारास नाकबूल. त्यास रत्नागिरीहून राजेश्री भिकाजीपंत व बालाजीपंत हिशेबनीस त्याचे भेटीस गेले होते. त्यानी व देशक यानी सागितले की, सदरहू करारास मान्य होणे, आणि कज्या एकवेळ तोडणे. त्यावरून आपण कबूल जहालो. त्यास हीरसावंत याने बालसावंत सर सुभा बरोबरी स्वारीस गेला आहे, तो आल्यावर सदरहूप्रमाणे वाटप करू, ऐसे सांगितले. त्याजवरून अमलदार यानी दोन महिने सालास राहिले. बालसावंतही स्वारीहून येतील, उपरांतीक तुमचे कराराप्रमाणे वाटप करून दिले जाईल; याप्रमाणे रामचंद्रपंताचे विद्यमाने भिकाजीपंत व बालाजीपत यानी ठराव केला. त्यावरून हाली त्या करारास बालसावंत बीन दादसावंत गैरमान्य होऊन आपला सदरहू गावचे खोतीचा विभागी न होय म्हणोन कतबा सरकारात लिहोन दिल्हा आहे. तरी दादसावंत हा तानसावंत हीरसावंत यांचा वंशज म्हणोन खोती चालवितो, तरी हा त्यांचा वंशज ऐसा आपणास ठावुक नाही. + त्याचे वडील खेडशीत होते. तानसावंत याचे वंशज ऐसा म्हणतो; परंतु हीरसावंत याची बायको खुद खावदीन गावात होती ती आपला हा काही नव्हे ऐसे म्हणत असे, म्हणोन आपले वडीलाही सांगितल. आपले भाऊबंद मीरकर, नाचणकर व शिवरेकर म्हणत आहेत, त्याप्रमाणे आपल्यापाशी हकिकत ठाऊक

× हीर सावत बीन दान सावंत * गुण सावंत बीन बाल सावंत.

+ जबानीतील हा भाग स्वार्थमूलक आहे.

होती ती लिहोन दिली आहे. आपले व तानसावंत यांचे वडिल सखे बंधू; ते विजापुराहून आले ही बहुतकाली गोष्ट. त्याचे नाव आपणास ठावुक नाही. तानसावंत व हीरसावंत हे दोघांची नावे आपले वडीलानी आपले विभागी म्हणोन सांगितले. त्यास त्याचे नकल जहाले. दादसावंतही कोण व त्याचे वडिलांचे नाव आपणास ठावुक नाही. आपले वडिलांची वंशावळ आपले वडिलानी सांगितली, त्याचे स्मरण राहिले, त्याची नावे आलाहिदा लिहोन दिली आहेत. छ १९ रबिदीलाकर करीना लिहोन दिला सही बिकलम बापुजी खंडो कुलकर्णी मौजे मजकूर.

परिशिष्ठ नं. ४

*यादी जबानी शंकर सावंत खोत मौजे झाडगाव व वाडा मिर्या कर्यात नेवरे सुमाई सेन सवान मया व आलफ (इ. स. १७५१) लिहोन दिली ऐसाजे. दाद सावंत व आपला मौजे मजकूर झाडगावचे खोती व मानपान व ठिकाण चौकीघर याजवीसी कज्या. त्यास आपला वडील व नाचणकर सावंत याचा वडील व सिवरेकर सावंत याचा वडील व झाडगावकर सावंत याचा वडील असे चौकीचे घर यातून विभक्त जहाले. त्यांची घरे आपल्या वडिलांचे घर श्रीजुगादेवी सामोर वाटा, हाली तेथे वानस आहे. व झाडगावकर व नाचणकर व शिवरेकर यांची घरे हाली राय सावंत व दाद सावंत आहेत. ही विभक्त जाहाले ते समयी मौजे मजकूरचे सर्व जमीन व शेतभात याचे वाटप जहाले. खोती व मान पान ठिकाण चौकी हे वाटावयाचे राहिले ते अमानत आहे. त्यास आपला वडील निराळा जहाला. त्याचे नाव कुक सावंत व झाडगावकर सावंत याचा वडील त्याचे नाव येस सावंत व नाचणकर पाल सावंत व शिवरेकर (गण सावंत) हे चौघ भाऊ येकाम निराळे जहाले. मुळ ठिकाणी अद्यावत घर नाही. आपला वडील सावंत नाव कुक सावंत याचा लेक गण सावंत येकच; त्यास पुत्र दोन; वडील हर सावंत; धाकटा माक + सावंत या उभयतांची लग्न जहाली. लग्न होऊन धाकटे यास मुले जहाली. थोरला यास मुल नाही. याजकरिता शिरगावकर पवार याची मुल नवरी करून लग्न जहाले. ते समयी पवार याने मिन्यावाडा लेकीस आंदण दिला मिन्या शिरगावचा. त्यास

* ही जबानी ग्रंथकर्त्याकडेच उपलब्ध झाली.

+ प. नं. ५ मध्ये महाकाळ म्हटले आहे माक हा महाकाळ चा अपभ्रंश दिसतो.

हर सावंत यास पुत्र चार जहाले. पुढे हर सावंत वृद्धकाळी मिऱ्यास आले. झाडगावचा कारभार विभागाप्रमाणे चालवित असत. हर सावंत याचा लेक तुप सावंत गावचा कारभार झाडगावचा करी, त्याचा काळ जहाल्यावर त्याचे पुतणे प्रतापराव सावंत तेही सर्व कारभार करीत असत; व झाडगावकर येस सावंत प्रथम विभक्त जहाला, त्याचा लेक राम सावंत यास पुत्र वडील गण सावंत, दुसरा नाग सावंत, तिसरा अंत सावंत, चौथा भोळ सावंत हे चार ; व नाचणकर व शिवरेकर ह्रे विभागाप्रमाणे आपला कारभार चालवित. त्यास (गण सावंत यास) पुत्र तान सावंत येक जाहला. गण सावंत मृत्यू पावला. पुढे तान सावंत हे नेवरेकर यांजपासी देसकती संबंधे कज्या करीत असत. याजकरिता नेवरे यास (नेवरे येथे) देशकानी मारिले, तो ठार मेला; मग त्याचे चुलते नाग सावंत व अंत सावंत व भोळसावंत परागंदावर घाटास गेले, तान सावंत यास पुत्र नाही नाग सावंत याचा वंश हाली आहे. अत सावंत याचा लेक गुण सावंत याचा लेक हर सावंत परागंदा होते. ते गावी आले. त्यानी आपले ठिकाणी हाली दाद सावंत आहेत तेथे घर बांधून राहिले. गावचा कारभार चालवित होते त्यास एक पुत्र होता, तो मृत्यू पावला; हर सावंतही पुढे मृत्यू पावले, त्याजवर अंतभट खंडकर यानी चार पाच वर्षे गावची खोती चालविली. त्याजवर पिल सावंत मिऱ्यास येऊन आपले वडील भिक सावंत व नाग सावंत याजपाशी पुशोले की, मी तेथे असता खंडकर याजपासून खोतीचे कामकाज करविता हे काय ? त्याजवर आपले वडील यानी पील सावंत यास पुसले तुजला हा कारभार झाडगावचा सांगतो तू चालविशील काय? तेव्हा त्याने मान्य केले मग वरील ठिकाणातून भाग वाटून देतो. त्याजवर आपले बाप व भाऊ यानी अर्ज केला की, झाडगावकर सावंत निराळेच आहेत, त्याजवर रामराव याजवळ जंजीरकर नायकवडी व बरे मातबर माणूस यांनी अर्ज केला, त्याजवरून आपले वतन आपले स्वाधीन केले. नायकवडी व मातबर माणूस यास सेते भाते दिली ती व येशवंतराव सवनीस याजकडे खोतीचा कारभार दिला होता तो त्याजकडून दूर करून आपण वतनदार म्हणोन आपले सवाधीन गाव केला. त्याजवर आपले बाप यानी कृष्णाहरी फाटक यास खोतीचे कामकाज सांगितले. सात आठ दहा वर्षे पर्यंत चालवित होते. उपरांत कृष्णा हरी आपले बाप याजपाशी येऊन म्हणो लागले की, आबाजीने लबाडी केली, त्याचे पारीपत्य जहाले माल सावंतास रायापासी अर्ज करून तेथून जैयगडी-

हून येईसा करावा. त्याजवरून आपले बाप बोलीले की, कउळाखेरीज कैसा येईल? त्यास कृष्णहरी बोलिले, तुमचा हुकूम जहाला तर रामरावूजवळ विनंती करून कउळ काढून घेऊन येईन. त्याजवर कउळ काढून घेऊन गावी आणिला. तेथपासूर दाद सावंत खोतीचे कामकाज करीतात व पील सावंताचा वंश भावाचा तेही चालवितात.

श्री.

+ परिशिष्ठ नं. ५

राजेश्री खोत सावंत व महाजन खंडकर व कुलकर्णी मौजे झाडगाव कर्यांत नेवरे.

स्नेहांकित देसकानी का। मजकूर रामराम सुमाई सन सितेन मया व आलफ. तुम्ही आम्हाजवळ येऊन सांगितले की, राजेश्री त्रिंबकराव विश्वनाथ पेठे येथे आले, ते समयी जुने ठिकाण झाडे वौ राजश्री बाळंभट साठे यानी आणून दाखविले; त्यामध्ये झाडगाव रहाटागर व खेडे ऐसे तीन गाव लिहिले होते; त्याप्रो तीन गावचे वैवाट राजेश्री त्रिंबकराव पेठे यानी विद्यमाने करविली ; ते समयी झाडगावचे वाडे खडपे व मुरुग व निवखोल वगैरे ठिकाणे ऐसी.-- *रहाटागर, खेडे याकडे वैहिवाटीस दिलीत ; त्याप्रो कागद करून पेठे व फाटक आगाशे यांसी दिलेत. त्याजवर पुढे श्रीमंत राजेश्री पंत प्रधान मुक्काम पुणे यांसी हे वर्तमान विदित जहाले; तेव्हा देसक व खोत व बालंभट साठे व कागद पत्र जुने आणविले, आणि कागदाची चौकशी केली, तेव्हा जुने कागदाचा भोगवटा बहुत काल महालात चालिला नाही, याकरिता ते कागद लटिके करून जुने

+ वरील पत्र रा. रा. बळवंत रावजीराव सावंत झाडगाव याजकडे उपलब्ध झाले आहे.

*आबाजीने रत्नागिरी किल्ला फितूर केल्याच्या आरोपावरून सुभेदार रामराव याने रत्नागिरीचे वतन सरकार जमा केले; तेव्हा मिऱ्या येथील सावंतानी ते पुन आपल्या ताब्यात घेऊन मुखत्यार या नात्याने कृष्णा हरी फाटक याजकडे त्याचा कारभार चालविण्यास दिले. झाडगावचे परागंदा असलेले सावंत साळुंखे आपल्या वतनावर आल्यानंतर ते झाडगावचा कारभार चालवू लागले. परंतु मिऱ्या येथील सावंत साळुंख्यांचे रहाटागर हे वतन त्यांच्या वतीने कृष्णा हरी फाटक हाच चालवित होता. पुढे पेशवाईत वाद उपस्थित होऊन फाटक हा जुना वहिवाटदार या नात्याने रहाटागर वतनाची सनद त्यालाच मिळाली असे परिशिष्ठ मजकूरवरून स्पष्ट दिसते.

भोगवटी याप्रो करार करून. सुभा सनद जंजीरेरत्नागिरी येथे सनद सादर जहाली. त्याजवरून आमचे वाडे व ठिकाणे सरकारचे आज्ञेप्रमाणे गावची रखवाली करीत होते. त्यास झाडगावी मार्गावरी पाहाने आगर बांधून राहिले. त्यास ५०० लारी मुकासा यासी ऐवज नेमून महालातून झाडगावी दिले होता. त्याप्रो ऐवज घेऊन रखवाली करीत व जागे जुगेसेते भाते मेळवून खोतीची देखरेख करू लागले. त्यांची नावे काय ते आपणास ठाऊक नाही. त्यास प्रथम भाऊ आला त्यास संतान जहाले; तेव्हा त्यातील एक पुरुष नाचणेस जाऊन राहिला, तेथे ठिकाण साधून खोती मेळऊन कमाविसी करू लागला. एक पुरुष मिऱ्यास जाऊन तेथील कमाविसी करू लागला. एकजन शिवरेची खोरबेती तेथे जाऊन घर बांधून राहिला. एक व आपला वडील ऐसे दोघे येथे राहिले. हरदूसारेचा विभाग मोकासी झाडगावी घेतला. त्यात विभाग चालत असे. त्यावरी विजापुरी हजरत पादशाही होती. तो मुकासाही × व चाकरी चालली आणि ऐवज ५०० लारी पावत होत्या. पुढे विजापूरची पादशाही मोडत आली; ते समयी मुकासा याचा खर्च दूर जहाला; तेव्हा महालातून ५०० लारी मुकाशाचे दूर जहाल्या; त्याचे वसूलास महालातून वरातदार येत तेव्हा तान सावंत व हीर सावंत हे रोखे टाकून देत व मनस्वी भाषणे हवालदारास व देसकास करीत; वसूल सुरलीत न देत; तेव्हा याचा त्याना द्वेश मांडला, त्यावरी महालाचे हवालदार व देसक यानी एकमत करून तान सावंत याने पुंडावे मांडीले आहे याचे पारिपत्य करावे, ऐसा विचार करून स्वारी नेमून तान सावंत यास धरून महालास न्यावा आणि तेथे पारिपत्य करून वसूल घ्यावा; हे वर्तमान तान सावंत यास कळले. त्याजवरी तान सावंत याने आपले भाऊबंद चाळीस पन्नास मेळऊन महालकरी याची खबर घ्यावयासी निघाला. हे वर्तमान महालकरी यासी कळले ; तेव्हा त्यानी शेपन्नास माणूस करून कसबा नेवरे तेथून निघोन वाडा आरे येथे आले; तेथे तान सावंत याची गाठ पडली. तेथे तान सावंत यासी मारिला; त्यावरी महाल करी फिरोन कसब्यात गेले. तान सावंत याजबरोबर लोक होते ते पलोन गेले; पुढे सारे मुलखात दंगाई जहाली; मोंगलाई मोडत आली; पुढे महाराज थोरले यांची मुलखात कबजात जाहाली. तान सावंत पडला.

× मोकासेदार यांचे वेतन एकंदर वसूलावर शेकडा १० टक्के प्रमाणे सरकारातून मिळत असे. महाराष्ट्रीय ज्ञानकोश पृष्ठ नं. १६१ व म. २१३ पहा.

दंगा जाहाला म्हणोन आपले आजे + पील सावंत राजाकडे चाकरीस गेले; त्यावरी देसकानी पील सावंत यासी कौल बोल देऊन राजाजवळ चाकरीस होते ते आणून गावी स्थापून गावची कमाविसी देखरेख सांगितली; त्याजपासून पील सावंत यानी काही शेते भाते मेलविली, ठिकाणे मेलवून किर्दी माहा दूर केली, आणि खोती पन्नास वर्षेपर्यंत सर्वांचे रुजवातीने करीत. हे वृत्त शिवधडे खोत व महालकरी यासी ठाऊक आहे; मध्ये धामधूमीमुळे गाव खराब पडला, त्यासमयी फगरवटार येथे जाऊन घर बांधून राहिले, निमित्य जे गावचे महाजन तेथे याजकरिता हे जाऊन तेथे राहिले; कुलकर्णी याचेही घर तेथे नेले; आणि तेथूनच काही दिवस गावचा कारभार करीत; पुढे स्वस्थ जहाल्यानंतर खालच्या ठिकाणावरी मागती येऊन राहिले; सेतेभाते व खोती चालवित. राजेश्री रामराव याचे कार्कीर्दी पावेतो आले. पुढे वृद्ध म्हातारे जहाले. कुणबावा भारी; कुणबावेस पैसा न मिले तेव्हा सेतेभाते गहाण ठेवित आणि कुणबावेची उगवणी करीत. ते समयी दाद सावंत याचा बाप माल सावंत हे काही सेतेभाते आपले म्हणोन कजिया केला नाही. त्यावरी कुणबावा न वसे म्हणोन पलोन जैगडास गेले. तेव्हा खोती आबा सावंत दाद सावंत याचा भाऊ चालवू लागला. पुढे त्यासही गावची उगवणी न होई. बाकी राहिली तेव्हा तोही पलोन जैगडास गेला. तेव्हा गावची खोतीची उगवणी * कृष्ण हरी व खंडकर महाजन करीत. तेव्हा कारकीर्द रामराव बालाजी यांची. त्याजवरी पील सावंत यासी रामराऊ यानी कौल बोल धाडून गावास आणिले. वृद्ध म्हातारे त्याचेने खोतीचा कारभार न वसे; थोडाबहूत कुणबावा करीत तो पुढे मृत्यू पावले. तेव्हा आपला बाप गण सावंत यासी नातवाणी कुणबावा वसेना. ते समयी निलो महादेव देस कुलकर्णी यासी कुणबावा दिल्हे; खंडो कृष्ण कुलकर्णी यासीही काही सेते गहाण ठेविली ; परंतु तेव्हा दाद सावंत यानी निचाई काही केली नाही. पील सावंत वारलीयावर खोती दाद सावंत यानी केली. त्याजवरी पुढे सरखेलचे कारकिर्दीत

+ पील सावंत हे शृंगारपूर येथे राजे सुर्वे यांच्या पदरी असता तेथून प्रथमच झाडगावी देसक आणि सुभेदार यांच्या मदतीने आले. त्यापूर्वी त्या घराण्याचे अस्तित्व झाडगावी नव्हते.

*मिऱ्या येथील सावंत साळुंखे यांचे मुखत्यार म्हणून कारभार पहात होते, स्वतंत्रपणे नाही.

मोत्याजीराव विचारे यांस हवाला होता ; त्यानी दाद सावंत यासी बोलावून नेऊन देसक तमाजी देसाई व शंकराजी महादेव देश कुलकर्णी व ग्रामस्थ शंकरजी खंडकर महाजन व गोविंद केशव वर्तक व + राज सावंत पालकर व येसोजी राणे खोत बसणकर यांचे विद्यमाने खोतीची हकिगत विचारली. तेव्हा त्यानी सांगितले की, बाळ सावंत याचे वडील खोती पुरातन चालवित, त्यास बाल सावंत यासी खोती द्यावी, ऐसे पाचाही सांगितले. त्यावरून मोत्याजीराव यानी खोती आपले स्वाधीन केली. यावरी पांच सात वर्षे खोती केली; पुढे श्रीमंतानी जंजीरा घेतला. त्यावरी दाद सावंत खोती करू लागले. अलिकडे आपण खोती मागो लागलो. त्यास दाद सावंत म्हणतात की, सेते ज्यास्ती आहेत ती वाटून देसील तेव्हा खोतीची तक्षी देईन ऐसे म्हणतो. सेत भात आमचे वडीलार्जीत आहे, ते आम्हाकडे आहे. येणेप्रमाणे हकिगत आहे. आपले पुरुषाची कुळकट आम्हास ठाऊक होती ती पेशजीचे करिणेत लिहून दिली आहे. येणेप्रो करिना वडीलांचे तोंडे ऐकिला तो लिहोन दिल्हे आहे. हे लिहिले सही छ९ माहे सफर. आलिकडे दाद सावंत म्हणतात. की, तुजकडे शेते जास्ती आहेत. त्यास मागे भाऊबंदांची वाटपे जहाली, त्यास एका भावाचे संतान आपण एका भावाचे संतान वरकड सारे सावंत, त्यास दाद सावंत व मिरकर, नाचणकर, शिवरेकर यांची शेते एकंदर केल्याने त्यांचेकडे शेतभात जमीन ज्यास्तीच होईल, ऐसे असोन आपल्याशी कजिया करितो. याचे वडील होते ते आम्हाशी काही कज्या केला नाही. ज्याचे नेमणूक तो आज पावेतो चालवित आला हे लिहिले. सही,

बी कलम, भिकाजी गोविंद देश कुलकर्णी. ता॥ हरचिरी.

॥ श्री ॥

परिशिष्ठ नं. ६

*करीना जबानी शंकर सावंत बीन तुक सावंत खोत मौजे झाड गाव व वाडा–मिर्या कर्यात नेवरे कसबा मजकूर. साहेबाचे सेवेशी करीना लिहोन दिला ऐसाजे. दाद सावंत बीन माल सावंत याचा व

+ पाली व वणके येथील सावंत देसाई हे चंदरसिग देसकाच्या हातकंबे गावी वास्तव्य करणाऱ्या (हरीसिग) नातवाचे वंशज दिसतात.

*वरील जबानी बळवंत रावजी सावंत मुक्काम झाडगाव यांजकडे उपलब्ध. झाली असून तिच्या जीर्णावस्थेमुळे खालील दोन चार ओळी फाटून गेल्या आहेत

आपला मौजे मजकूरचे खोतीवीसी व मानपान ठिकाण चौकी घर याजवीसी कजीया. त्या आपला वडील व नाचणकर याचा वडील व शिवरेकर याचा वडील व झाडगावकर सावंत आहे याचा वडील, असे चौकीचे ठिकाण घर यातून विभक्त जहाले. त्यांची घरे आपल्या वडिलांचे घर श्रीजुगादेवी समोर वाटा, हाली येथे बाणस कुलकर्णी आहे व झाडगावकर व नाचणकर व शिवरेकर यांची घरे हाली राय सावंत व दाद सावंत आहेत. ही विभक्त जहाले ते समयी मौजे मजकूरचे सर्व वाटे जहाले. खोती व मानपान ठिकाण चौकी हे वाटावयाचे राहिले. समाईक आहे. त्यास आपला वडिल निराळा जहाला; चौकीवरील घरातून विभक्त जहाला. त्याचे नाव कूक सावंत व झाडगावकर याचा वडिल व नाचणकर याचा वडिल व शिवरेकर याचा वडिल असे एकामच निराळे जहाले. त्यास आपला वडिल कूक सावंत याचा लेक गण सावंत एकच; त्यास गण सावंत, यास पुत्र दोन, त्यांची नावे वडिल हर सावंत व लहान महाकाल सावंत; या उभयतांची लग्नें जहाली. धाकटा भाऊ यास मुले जहाली; थोरला यास मुल नाही; याजकरीता मौजे शिरगाव येथे पवार होता, त्याची मुल नवरी करून लग्न जहाले. ते समयी पवार याने वाडा मिर्या लेकीस आणंद दिला. त्यास हर सावंत यास पुत्र चार जहाले. पुढे हर सावंत वृद्धपकाळी मिऱ्यास आले. त्यास मौजे मजकूरचा कारभार सर्व विभागाप्रमाणे चालवित असता हर सावंत मिन्यास आले. त्याचा लेक तूप सावंत तो सर्व कारभार चालवित होता, व राम सावंत झाडगावी असता तेही विभागाप्रमाणे चालवित असत. तूप सावंत यांचा काळ जहाला. मग त्यांचे पुतणे प्रतापराव हे व काही गण सावंत व नाग सावंत झाडगावकर हे चालवित असत. गाव संबंधे कारभार असेल तो सर्व करीत असता गण सावंत मृत्यू पावला. राम सावंत झाडगावी असत. त्यास पुत्र चार. त्यांची नावे वडील गण सावंत व नाग सावंत व अंत सावंत व भोळ सावंत हे, त्यास गण सावंत यास पुत्र तान सावंत एक जहाला होता. त्यास तान सावंत नेवरेकर याजपाशी देसकंती संबंधे कजीया करीत असे ; याजकरिता देशकानी नेवऱ्यास तान सावंत मारीला. मग नाग सावंत व अंत सावंत व भोळ सावंत असे गावातून निघून वर घाटास गेले. तान सावंत यास पुत्र नाही. त्यातील वंश नाग सावंत याचा आहे हाली, त्यास वर घाटास गेले. प्रतापराव सर्व कारभार गावासंबंधे चालवित असता पुढे प्रतापराव सावंत यांचा काळ जहाला. मग त्याचा लेक तान सावंत मिरकर हे सर्व

गावसंबंधे कारभार करीत होते. पुढे अचल सावंत मिरकर चालवित होते. मग हिर सावंत मिरकर व त्याचा लेक काळ सावंत याने असे चालविले. त्यास त्याचा काळ जहाला. तो अंत सावंत झाडगावकर परागंदा होते. त्याचा लेक गुण सावंत याचा लेक हर सावंत झाडगावकर हे मौजे मजकूरी आले. त्यानी आपले ठिकाणी घर बांधून हाली दाद सावंत येथे राहिले; आणि गाव संबंधे आपले चुलते भिक सावंत असे सर्व कारभार चालवित होते. हर सावंतास एक पुत्र होता तो मृत्यु पावला. व पुढे हर सावंतही मृत्यू पावला. मग अंत भट खंडकर याने आपले चुलते त्याचे आज्ञेवरून चार-पाच वर्षे गावचा कारभार चालविला. त्याजवर पील सावंत मिऱ्यास येऊन आपले वडिल भिक सावंत व नाग सावंत याजपाशी पुसीले की, मी तेथे असता खंडकर याजकडोन खोतीचे कामकाज करविता हे काय ? तेव्हा आपले वडिल यानी पील सावंत यासी सांगितले की, तुजला कारभार सर्व सांगतो, तू गाव चालविशील की काय? तेव्हा त्याने मान्य केले, मग पील सावंत वरिल ठिकाणातून येऊन हाली घर आहे हे ठिकाणी बांधून राहिला आणि गावचा कारभार सर्व चालवू लागला. त्यास अंतभट आपले वडिल भिक सावंत व नाग सावंत यापाशी बोलू लागला की, हा सावंत कोण कोठील आणि मी गाव चालवित होतो. हा नको म्हणून यासी चालवावयासी सांगितला त्याजवर आपले वडिल यानी सांगितले की, आपलाच भाऊबंद आहे. त्याने गावचा कारभार चालविला तरी आम्हीच चालविला. त्यास पुढ कितीका दिवशी माल सावंत झाडगावकर खेडशीतून आले. त्यास पील सावंत याचा काल होत आला. मग माल सावंत याचा लेक आबाजी याने दोन वर्षे गाव चालवून उपरांतिक पलोन किले जैगडास श्रीमंत सरखेल याजकडे गेला तेथे चाकर राहून जंजीरे रत्नागिरीस फितुर करू लागला. हे वर्तमान श्रीमंत रामराव यास कळले. त्यास जंजिरे रत्नागिरीस शिडचा फितूर करून लाविल्या. मग सरखेल याजकडील लोकांचा मोड जाहला. मग रामराव यानी तजविजीचे मते करून आबाजी सावंत झाडगावकर त्याच्या सोयऱ्याच्या हातून आबाजीस कालवा-देवीस आणविला आणि स्वारी पाठऊन धरून आणिला. जंजीरे मजकूरी आणिला. सोटचाचा मार देऊन ठार मारिला आणि पर-वारी याजकडून ओढून टाकविला. तेव्हा आपले बाप व भाऊ धोंड सावंत व हर सावंत व दाद सावंत आणखी १०।२० असामी रामराव

याजपाशी चाकरीस होते, त्यानी अर्ज केला की, आबाजी सावंत याने फितूर केला त्याचे पारीपत्य साहेबी केले. त्यास अग्न द्यावयाची आज्ञा करावी; असा अर्ज करिता दुसरे दिवशी संध्याकाळी अग्न द्यावयाची जहाली. मग अग्न जहाल्यावर रामराव यानी हा झाडगावचा सावंत म्हणवितो आणि किल्ल्यास शिडचा लाविल्या सबब सरकारात वतन ठेऊन त्याची वाटणी शेतभात याचे करून जंजीरकर + नायकवडी व

\+ मद्रास इलाख्यातील मदुरा ही पांड्य राज्याची राजधानी होती. चोलांच्या राजाने पांड्य राजांचा पराभव करून मदुरा आपल्या ताब्यात घेतली, तेव्हा पांड्य राजा विजयनगरच्या राजापाशी आश्रयास गेला; हे पाहून विजयनगरच्या रामराजाने आपला सेनानायक कोटीय नागम यास फौज देऊन मदुरेवर चाल करून पाठविले. तेव्हा कोटीय नागम याने जाऊन चोलास जिंकिले; परंतु पांड्य राजास त्याच्या गादीवर न बसवता आपणच कारभार पाहू लागला. तेव्हा राम-राजाने त्याच्याच विश्वनाथ नावाच्या मुलाबरोबर फौज देऊन त्याला कोटीय नागम याजवर पाठविले. त्याने आपल्या बापाचा पराभव करून त्याला कैद केले आणि विजय नगरचीही सत्ता झुगारून इ. स १५५९ त मदुरा येथे स्वतंत्र राज्य स्थापिले. विश्वनाथ हा विजयानगरचा सेनानायक होता, म्हणून ते मदुरेचे राज्य नायक घराण या नावाने प्रसिद्धीस आले. या नायक घराण्यात विश्वनाथासह एकंदर १३ राजे होऊन त्यानी इ स. १५५९ पासून १७४१ पर्यंत राज्य केले. शेवटी ते राज्य मराठ्यांच्या ताब्यात गेले. या नायक घराण्यात एक मोठी महत्वाची गोष्ट घडून आली, ती म्हणजे पाळेगार पद्धत ही होय. या घराण्याचा संस्थापक विश्वनाथ याने ही पद्धत अंमलात आणिली. दहा किंवा बारा गावचा एक गट करून त्यास पाळेयम् असे नाव दिले आणि त्याचा वसूल वगैरे करण्या-करिता प्रत्येक गटावर एक एक अधिकारी नेमीला. त्याला पाळेगार हे नाव दिले. त्याने आपल्या राज्यात असे ७२ पाळेगार ठिकठिकाणी नेमिले होते ते जमिनीचा वसूल करीत व आपआपल्या पाळयममध्ये व्यवस्था ठेवीत. सरकारातून त्याबद्दल त्याना काही वेतनही मिळत असे व जमीनीही दिल्या जात. त्यामुळे मध्यवर्ती सरकारला वसूलाचा त्रास विशेष न पडता कारभार सुयंत्रित चाले; तेव्हा ही पद्धत मुसलमानी अमदानीतही अमलात आली. बहामनी राज्याच्या सुलतानानीही जमीनीच्या वसुलाकरिता असेच लहान लहान अधिकारी नेमिले व ही पद्धत नायक घराण्यामधून घेतली म्हणून त्या अधिकाऱ्याना नाईक ही पदवी दिली, असे रा. रा. केतकर यांच्या महाराष्ट्रीय ज्ञानकोशावरून स्पष्ट दिसून येते. महाराष्ट्रा-त जमीनीच्या महसुलाकरिता नेमिलेल्या नाईक लोकात मराठ्याप्रमाणे ब्राह्मणही होते; पुढे पुढे या वर्गाने चांगली कामगिरी बजावून बादशहाकडून वतनेही मिळविली. तेव्हा त्यांच्या वतनाना नायकवाडी वतने असे म्हणण्यात येत असे हे पुढे दिलेल्या उताऱ्यावरून वाचकांच्या नजरेस येईल.

मातबर मनुष्यास द्यावे, आणि खोतीचा कारभार यशवंतराव–सबनीस जंजिरे मजकूर यासी सांगितला. मग आपले बाप व भाऊबंद चाकरीस होते. त्यानी हातची हत्यारे रामराव याजपाशी ठेवून अर्ज केला की, वतन आमचे साहेबी वाटून जंजीरकर नायकवडी यास दिलें, ह्याजवरून राव यानी आपले बाप व भाऊ धोंड सावंत यांसी पुसीलें की, तुमचे वतन कैसे ते सांगणे. त्याजवरून सांगितले की, झाडगांवचे विभाग चार. मिरकर एक नाचणकर एक शिवरेकर एक व झाडगावकर एक असे चार. व खोती मानपान चौकीचा असे आहे. त्याजवरून राव यानी सांगितले, मिरकर, शिवरेकर, नाचणकर यानचे वतन विभाग असेल तो वाटून देत नाही. झाडगावकर याचाच वाटून देतो. तेव्हा आपले बाप व भाऊबंद यानी अर्ज केला की, झाडगावकर सावंत निराळाच आहे. एकाने लबाडी केली म्हणोन आमचे सर्वांचे वतन साहेब देतात. व जंजीरकर नायकवडी व बरे मातबर माणूस होते. त्यानीही राव याजपाशी विनंती केली की, मिरकर सावंत व आम्ही स्वामीचे चाकर असून त्यांचे वतन आज धनी आम्हास देतात, त्यास मिरकर व नाचणकर व शिवरेकर व झाडगावकर हे काही

Source book of Maratha History Vol I page 49 by R. P. Patwardhan B. A. and H. G. Rawlinson M. A.

Niloji Nilkanthrao, an Officer of the Nizamshah and holding a Naikwadi Watan was at the Fort of Purandhar. Holding the fort, he used to collect revenue from the surrounding tract. He had villages in Inam & collected dues from every adjoining village.

अशा तऱ्हेने रत्नागिरी जिल्ह्यात नायकवडी वतन संपादन केलेले बरेच मराठे असून त्यांना नायकवडी किंवा नाईक घराण्याचे मराठे अशी म्हणण्याची चाल पडली आहे. त्यांचे कुळ इतर थोर घराण्यातील मराठ्यापेक्षा यत्किंचितही कमी नाही, असे वरील हकीगतीवरून स्पष्ट होते; मात्र तत्कालीन आलेल्या सरदार, सुभेदार, मोकासेदार वगैरे बड्या लोकांचा व यांचा शरीरसंबंध होत नसे. याचे कारण नाईक या अधिकारावर असलेल्या लोकांचा सामाजिक दर्जा लहान मानला जात असे हेच होय; परंतु हल्ली हा भ्रम हळू हळू दूर होऊन वरील दोन्ही घराण्यात कोठे कोठे शरीरसंबंध होऊ लागले आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे.

निराळे नव्हत. साहेबी कृपाळू होऊन सर्व वतन मिरकर सावंत शेवेशी चाकर आहेत, याजवरून जर देऊन यांचे स्वाधीन करावे, व आपले बाप व भाऊबंद यानीही अर्ज केला. त्याजरून राव कृपाळू होऊन यशवंतराव याजकडील गावसंबंधे कारभार होता, तो दूर करून सर्व वतन आपले बाप व भाऊ धोंड सावंत यांचे स्वाधीन केले; मग आपले बाप यानी कृष्ण हरी फाटक यास आपले निसबतीचा, खोतीचे काज-काम सांगितले.

परिशिष्ठ नं. ७

